# प्रकरण चौथे

## श्री रत्नाप्पा कुंभार : आमदार व महाराष्ट्र राज्याचे मंत्री म्हणून कार्य ---

## प्रकरण चौथे

### श्री रत्नाप्पा कुंभार : आमदार व महाराष्ट्र राज्याचे मंत्री म्हणून कार्य -

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुका म्हणजे राजकीय क्षेत्रातील जागृत भाग असून जिल्ह्यातील एक नेहमी आघाडीवर असणारा तालुका असे म्हणता येईल. शिरोळ भागातील कृष्णा काठची सुपिक भूमी अधिक सुजलाम सुफलाम् करण्यासाठी ठिकठिकाणी कृष्णा नदीच्या पाण्याचा उपयोग लिफ्ट इरिगेशन योजना आणून या पाण्याने आधीच सोन्यासारखी असलेली जमीन सोने पिकविण्याकरिता कसण्यासाठी लोकांना प्रेरणा देण्यात आली. या प्रेरकामध्ये शिरोळ तालुक्यातील रत्नाप्पा कुंभार या लाडक्या सुपुत्राचे स्थान फार मोठे आहे.

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेपासून ते राजकारणात भाग घेत आहेत. संस्थान विलीन झाल्यानंतर त्यानी जिल्हा कॉंग्रेस कमिटीची स्थापना केली व दहा वर्षे तेच जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष होते.

१९५२ च्या निवडणूकीत शिरोळ तालुक्यातून त्यानी लोकसभेची निवडणूक लढविली पण या कामी त्याना यश लाभले नाही.[१] तसेच १९५७ च्या निवडणूकीत विधान सभेला शिरोळ तालुक्यातूनच ते उभे राहिले होते पण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमुळे ही निवडणूक त्याना गमवावी लागली.[२]

१९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कॉंग्रेसला जागा मिळाली नाही. करवीर जनतेने कॉंग्रेसला संपूर्ण वाळीत

टाकल्यासारखे केले इतके असून देखील आण्णानी अशा भयानक प्रसंगातून आपल्या खडतर प्रयत्नाने आणि संघटना कुशलतेने कॉंग्रेसचा एक निष्ठावान सेवक म्हणून कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस जिवंत राखण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अनेक मोठमोठ्या पुढाऱ्यांनी हार खाल्ली. पण रत्नाप्पा आण्णानी निवडणूक ही दुय्यम मानून आपल्या भागामध्ये जनतेच्या विकासाच्या प्रचंड कामाचा व्याप निर्माण केला. इतर पुढाऱ्याप्रमाणे हाय न खाता आण्णानी गोरगरीब पददलित जनतेच्या कल्याणाचे काम चालू केले. आपल्या देशामध्ये सत्ता हाती असणे अगर विधि मंडळामध्ये निवडून जाणे, मोठेपणाचे लक्षण मानले जाते. आण्णानी सत्तेची अभिलाषा धरली नाही. कॉंग्रेस पक्ष व देश यांच्या हिताकडे नजर ठेवून सतत काम करणे हाच दृष्टिकोण त्यांच्यात दिसून येतो. या संदर्भात कै. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या स्मृतीकोषातील एक आठवण आण्णांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सांगितलेली आहे. १९५४-५५ च्या दरम्यान साखर कारखान्याचे चेअरमनशिप त्यावेळचे पुरवठा मंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी स्वीकारावी असे श्री रत्नाप्पा कुंभार व तात्यासाहेब कोरे यांनी सुचवले. परंतु एखाद्या मंत्र्याने कारखान्याच्या दैनंदिन कामात सामील व्हावे हे कै. यशवंतराव चव्हाण यांना मान्य नव्हते. अशावेळी श्री रत्नाप्पा कुंभार व श्री तात्यासाहेब कोरे यांची समजूत काढताना कै. यशवंतराव चव्हाण यांना फार कष्ट घ्यावे लागले. म्हणूनच ते म्हणतात की या पाठीमागे त्यांचा उद्देश्य हा सत्तासंपादनाचा नव्हता तर सेवेचा होता.[3]

१९६२ च्या निवडणूकीत श्री रत्नाप्पा कुंभार भरघोस मतानी शिरोळ मतदार संघातून निवडून आले.[4] दे.भ.रत्नाप्पा कुंभार यांनी आमदार या नात्याने विधायक दृष्टी ठेवून कामाला सुरुवात केली. त्यांची विधायक दृष्टी वास्तवतेला धरून आहे. त्याला संत विज्ञानाची आहे. श्री रत्नाप्पा कुंभारांनी आपल्या जीवन निष्ठेची दिशा या दोन दृष्टीकोनातून निवडली आहे. त्यानी यासाठी अहोरात्र आपल्या भागातील जनतेची सेवा केली आहे व करीत आहेत.

आण्णा हे अतिशय स्पष्ट विचाराचे आचाराचे असल्यामुळे बऱ्याच

वेळा अडचणीत आलेले आहेत. मंत्रीपद म्हणजे काही सर्वस्व नव्हे. अगदी सामान्य जनतेत राहून देखिल ते आपल्या अविकसित भागाचा असामान्य असा सर्वांगीण विकास करताना दिसतात. अनेक सहकारी संस्था, उद्योगधन्दे, शिक्षण संस्था, पाणी पुरवठा योजना, ट्रॉली ट्रॅक्टर योजना, डिस्टीलरी प्लॅन्ट योजना इ. योजना मार्फत त्यानी जनता संपर्क साधून सामान्य माणसांची अंतःकरणे जिंकली आहेत. म्हणूनच १९६७ च्या सार्वजनिक निवडणूकीत ते शिराळ मतदार संघातून पुनः निवडून आले.[5]

रत्नाप्पा कुंभारांचे राजकीय जीवनातील नेतृत्व भोगमय नसून त्यागमय आहे व ते इतरजनानादेखिल मार्गदर्शक ठरले आहे. प्रत्यक्ष कार्य करताना इतराना कार्यप्रवृत्त करण्याची आण्णाची हातोटी वाखणण्यासारखी आहे. आण्णाचा त्याग, सेवा, प्रदीर्घ उद्योगशीलता, प्रामाणिकपणा, अविश्रांत धडपड, प्रेमाचा जिव्हाळा, कर्तव्य कठोरता, प्राप्त प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देण्याची धडाडी, अपयशाने खचून न जाता दुप्पट जोमाने पाठलाग करण्याची जिद्द असे अनेक गुण त्यांच्यात दिसून येतात.

राजकीय सत्ता, आश्रय वा मदत आदीची अभिलाषा न बाळगता स्वाभीमानाने त्यांनी वाचनालये, सभागृहे, रस्ते, पाणंद रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, इ. छोटीमोठी कार्ये ग्रामीण, तालुका, जिल्हा पातळीवर पंचवार्षिक योजनेद्वारा पूर्ण केली. सहकार चळवळ मूर्त स्वरूपात आणून आपल्या भागाचा कायापालट केला.

पुढे १९७२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत शिराळ तालुक्यातून तिसऱ्या वेळी रत्नाप्पा कुंभार निवडून आले.[6] व पुढे नोव्हेंबर १९७४ मध्ये गृह, माहिती व पुरवठा मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यावेळचे त्यांच्या कार्याचे समालोचन पुढीलप्रमाणे ---

## श्री रत्नाप्पा कुंभार यांचे गृह, माहिती व पुरवठा मंत्री म्हणून कार्य --

( नोव्हेंबर १९७४ ते फेब्रुवारी १९७५ )

श्री वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सत्तेवर आल्यानंतर त्यांनी आपल्या मंत्रीमंडळात श्री रत्नाप्पा कुंभार यांना गृह आणि माहिती व पुरवठा मंत्री म्हणून दिनांक ९ नोव्हेंबर १९७४ रोजी राज्यपालामार्फत शपथ दिली.[७] राज्यात कायदा व सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी गृहमंत्र्यावर असते त्यामुळे रत्नाप्पा कुंभार यांनी गृहमंत्री पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर कायदा व सुव्यवस्था बिघडणारी जी काही प्रकरणे निर्माण झाली ती आपल्या मुत्सद्देगिरीने व कुशल नेतृत्वाने त्यानी सोडविण्याचा प्रयत्न केला. गृहमंत्री असताना त्यानी केलेल्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे ---

### मौजे ( जोपूळ ( जिल्हा नाशिक ) येथे विधवा स्त्रियांना झालेली मारहाण --

ऑगस्ट १९७४ मध्ये नाशिक जिल्ह्यातील मौजे जोपूळ या गावी भूताटकीच्या कारणावरुन विधवांना विवस्त्र करुन मारहाण करण्यात आली याबाबत श्री उमर काझी ( नागपाडा ) यांनी विधानसभेत गृहमंत्री रत्नाप्पा कुंभार यांना प्रश्न विचारला असता त्यानी पुढीलप्रमाणे त्याचे समर्थन केले --

" सदर प्रकरणी गावकऱ्यांनी जमून चार स्त्रिया व एक पुरुष हे भूताटकीचे प्रयोग करतात ह्या कारणा वरुन त्यांना मारुतीच्या देवळासमोर बोलावून आणून मारहाण केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे एकंदर दहा इसमांविरुध्द कोर्टात दिनांक ९ सप्टेंबर १९७४ रोजी दोषारोप पत्र दाखल केले आहे. म्हणजेच सदर प्रकरण सध्या न्याय प्रविष्ट आहे , या प्रकरणामध्ये दहा माणसांना पकडण्यात आले असून यामध्ये पाच स्त्रिया व पाच पुरुष आहेत. सदरहू महिलांना विवस्त्र करण्यात आले नव्हते असा खुलासा त्यानी केला."[८]

अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली राज्य पोलिसांनी अटक केलेले स्मगलर्स --

राज्यात १ जानेवारी १९७४ ते १५ ऑक्टोबर १९७४ पर्यन्तच्या कालावधीत भारत संरक्षण कायदा व अंतर्गत सुरक्षा कायदा या खाली किती स्मगलर्सना अटक करण्यात आली आहे असा प्रश्न श्रीमती मृणाल गोरे ( गोरेगांव ) यांनी विचारला असता त्याला उत्तर श्री रत्नाप्पा कुंभार यांनी पुढीलप्रमाणे दिले ---

" सदर कालावधित स्थानबध्द करण्याचे अधिकार असलेल्या या राज्यातील अधिका-यांनी स्मगलींगला मदत करण्याबद्दल १२ व्यक्तींना स्थानबध्द केले.या शिवाय १७ व्यक्ती विरुध्द स्थानबध्दतेचे आदेश काढण्यात आले होते. त्यापैकी ६ व्यक्तींना १५ ऑक्टोबर १९७४ नंतर स्थानबध्द करण्यात आले व ११ व्यक्तींना स्थानबध्द करण्यात आलेले नाही. या शिवाय भारत सरकारने अंतर्गत कायद्याखाली काढलेले स्थानबध्दतेचे आदेश पोलिस आयुक्त मुंबई यांनी १२ व्यक्तींवर बजावले आहेत व सदर व्यक्तींना कारागृहात कोणत्याही खास सोई व सवलती देण्यात येत नाहीत असे स्पष्ट केले. तसेच पोलिस आयुक्त , मुंबई, पुणे, नागपूर व जिल्हा दंडाधिकारी यांनी स्थानबध्द केलेल्या कोणाही स्थानबध्दाला राज्याबाहेर हलविण्यात आले नसल्याचे सांगितले. परंतु अंतर्गत सुरक्षा कायद्यान्वये भारत सरकारने आदेश काढून ज्या व्यक्तींना स्थानबध्द करण्यात आले होते त्याना भारत सरकारने काढलेल्या आदेशानुसारच राज्या बाहेरील तुरुंगात पाठविण्यात आले आहे. "

नागपूर शहरातील सायकल रिक्षा चालविणा-या व्यवसायात गुंतलेल्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत शासनाचा निर्णय --

वरील प्रश्नाबाबत शासनाने समिती नेमण्याचा निर्णय घेतलेला असून त्याबाबतीत कारवाई लौकरच करण्यात येईल. ही समिती नेमण्याकरिता विदर्भ व मराठवाडा येथून दोन लोकांची नावे यावयाची आहेत. ती नावे सुचवण्यासाठी त्या त्या भागातील आयुक्ताना सांगण्यात आले असून ती नावे आल्यानंतर

समिती तयार होईल असे रत्नाप्पा कुंभार यांनी सांगितले.[१०]

पुणे शहरातील माजी पोलिस फौजदारांच्या विधवांचे कौटुंबिक निवृत्ती वेतनाचे प्रलंबित अर्ज --

प्रमोद नवलकर ( गिरगांव ) यांनी पुढील प्रश्न सभागृहात विचारले -
(१) पुणे शहरातील किती माजी पोलीस फौजदारांच्या विधवांचे कौटुंबिक निवृत्ती वेतन मिळण्याबाबतचे अर्ज जून १९७४ अखेर शासनाकडे प्रलंबित आहेत व किती कालावधीपासून ---

(२) संबंधित व्यक्तींनी याबाबत शासना विरुध्द कोर्टात दावा दाखल करण्याच्या नोटीस मा. पोलिस कमिशनर पुणे व त्याची प्रत सचिव गृहखाते मुंबई यांचेकडे दिनांक २७ डिसेंबर १९७३ चे सुमारास त्याचे वकिलामार्फत पाठविले आहेत हे खरे आहे काय ?

रत्नाप्पा कुंभार व श्री व .पुन. नाईक यांनी वरील प्रश्नाचा खुलासा पुढीलप्रमाणे केला ---

" शासनाकडे २७ डिसेंबर १९७३ पासून फक्त एक अर्ज प्रलंबित आहे. पुणे शहरातील माजी फौजदार श्री शिराजुद्दीन हाजी हबिब शेख दिनांक ४ मार्च १९६९ रोजी मृत्यू पावले, त्याना दोन पत्नी होत्या, त्या दोघीपासून झालेल्या मुलांचा पत्ता लागत नाही म्हणून श्री शेख यांच्या द्वितीय पत्नी श्रीमती जहूर अख्तार यांच्या नावाने कौटुंबिक वेतनाबद्दलचे कागदपत्र तयार करुन पोलिस आयुक्त पुणे यांनी महालेखापाल, मुंबई यांचेकडे दिनांक २८ मे १९६९ रोजी पाठवले, परंतु महालेखापाल, मुंबई यांनी श्री शेख यांच्या दोन्ही पत्नीना वारस ठरवून श्रीमती जहूर अख्तार यांना पेन्शनचा निम्मा हिस्सा व ग्रॅच्युइटीचा योग्य हिस्सा दिनांक २८ जून १९६९ रोजी मंजूर केला. परंतु श्रीमती जहूर अख्तार यांचा असा दावा आहे की, श्री शेख यांच्या पहिल्या पत्नीस तलाख दिलेला होता म्हणून त्या एकट्याच कौटुंबिक निवृत्ती वेतनाला वारस आहेत व त्या प्रमाणे त्यानी दि. २७ डिसेंबर १९७३ रोजी त्यांचे वकिलामार्फत या प्रकरणी न्यायालयात जाण्याबाबतची

नोटीस पोलिस आयुक्त, पुणे यांना दिली व त्याची एक प्रत शासनाकडे पाठवली. श्रीमती जहूर अख्तार यांच्या अर्जाच्या प्रकरणी कायदेशीर बाब निर्माण झाल्यामुळे त्याचा निर्णय होण्यास कालावधी लागेल असा खुलासा करण्यात आला.

परंतु महालेखापाल मुंबई यांनी श्री शेख यांच्या दोन्ही पत्नींना वारस ठरवून श्रीमती जहूर अख्तार यांना पेन्शनचा निम्मा हिस्सा व ग्रॅच्युइटीचा योग्य हिस्सा दि. २८ जून १९६९ रोजी मंजूर केला. त्याच प्रमाणे मासिक ५५ रु. अर्धी पेन्शन श्रीमती जहूर अख्तार यांना मिळत आहे. त्याच प्रमाणे त्यांना ग्रॅच्युईटी रकमे पैकी रु. ३६६-६६ जुलै १९६९ मध्ये देण्यात आली आहेत. तसेच त्यांच्या दोन्ही मुलांना एकूण ग्रॅच्युईटीची रक्कम रु. ७३३-३४ फेब्रुवारी १९७४ मध्ये मंजूर करण्यात आली असून ती त्यांना ता. २५-२-७४ रोजी देण्यात आली आहे. परंतु त्या बाईंनी २७ डिसेंबर १९७३ रोजी सगळी पेन्शन मिळाली पाहिजे म्हणून पुन: अर्ज केला तेव्हा त्या बाबतीत विचार करून कायदेशीररित्या काय करता येईल याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे असे रत्नाप्पा कुंभार यांनी स्पष्ट केले. तसेच त्या बाईचा अर्ज आल्यानंतर पुढील कारवाईस कालावधी लागेल असा अर्थ आहे. कारण पहिली पत्नी मेलेली आहे दुसरी पत्नी श्रीमती जहूर अख्तार यांनी अर्ज करण्यामध्येच उशिर केला आहे असे श्री रत्नाप्पा कुंभार यांनी सांगितले.[११]

नागपूर येथील " यशवंत " स्टेडियमचे बांधकाम कोसळून झालेला अपघात -

नागपूर येथील " यशवंत " स्टेडियमचे बांधकाम चालू असताना दिनांक २१ सप्टेंबर १९७४ रोजी बाराच्या सुमारास स्टेडियमचा एक भाग कोसळला. या मध्ये ७ व्यक्ती मृत्यू पावल्या व ८ व्यक्ती जखमी झाल्या. अपघातात मृत्यू पावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या नातेवाईकांना ५,००० रु. व जखमी झालेल्या प्रत्येक व्यक्तीला १,००० रु. आर्थिक मदत, नागपूर महानगर पालिकेकडून देण्यात आली असा खुलासा श्री रत्नाप्पा कुंभार यांनी केला.[१२]

बृहन्मुंबईत ' अप्सरा ' सिनेमा गृहाचा रद्द करण्यात आलेला परवाना --

समाजाच्या विकासाच्या आड येणाऱ्या गोष्टींचा बंदोबस्त करावा लागतो. त्यामुळे पोलिस आयुक्त मुंबई, यांनी त्यांच्या २७ सप्टेंबर १९७४ च्या आदेशान्वये, अप्सरा सिनेमाचा परवाना १ नोव्हेंबर १९७४ पासून रद्द केला. कारण पोलिस आयुक्त, मुंबई यांच्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र सिनेमा ( रेग्युलेशन ) नियम, १९६६ मधील नियम १०९ ( तिकिटे अनुसक्ती दिलेल्या तिकिट दरातच विकावी ) १०९-अ ( तिकिटे सात दिवसापेक्षा जास्त आधी विकू नये ) व १११ ( सर्व तिकिटे प्रत्यक्ष विकली गेल्याशिवाय तिकिटांची विक्री थांबवू नये ) ह्या तरतुदींचे उल्लघन झाले होते, तसेच नियम १०८ ( तिकिटाच्या विक्रीसाठी अनुसंक्तीच्या ) तरतुदींचे उल्लंघन करण्यास प्रोत्साहन दिले होते त्यामुळे ही कारवाई करण्यात आली होती असे श्री रत्नाप्पा कुंभार यांनी सांगितले.[१३]

भोईवाडा येथे शिवाजी महाराजांचा पुतळा फोडण्याचा प्रकार --

दिनांक १८ मे १९७४ रोजी काही समाज कंटकांनी भोईवाडा येथे शिवसेनेचे कार्यालयाच्या आवारात असलेल्या चाळीवर दगडफेक केली. परंतु त्यात कार्यालयाचे अथवा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्याचे काही नुकसान झाले नसून त्या सुमारास त्या विभागात झालेल्या दंगली संदर्भात पोलिसानी दोन गुन्हे दाखल केले असून पहिल्या गुन्ह्यात २ इसमांची नावे आहेत तर दुसऱ्या गुन्ह्यामध्ये २६ इसमांची नावे असल्याचे श्री रत्नाप्पा कुंभार यांनी स्पष्ट केले.[१४]

आदिवासी मुलींना जबरदस्तीने पळवून नेल्याबाबत धानोरा पोलिस स्टेशनवर नोंदविण्यात आलेली तक्रार --

दिनांक ३ ऑगस्ट १९७४ वा त्या सुमारास धनोरा ( जिल्हा चंद्रपूर ) पोलिस स्टेशनवर एका आदिवासी मुलींना जबरदस्तीने पळवून नेल्याची तक्रार मुलीच्या नातेवाईकांनी नोंदविली. या बाबतीत चौकशी करण्यात येऊन तीन

आरोपींना ६ व ७ ऑगस्ट १९७४ रोजी अटक करण्यात आली. पळवून नेलेल्या मुलीला परत आणण्यात आले. चौकशी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात खटला पाठविण्यात येईल असे श्री रत्नाप्पा कुंभार यांनी स्पष्ट केले.[१५]

ऑगस्ट - नोव्हेंबर १९७४ या महिन्यात कामगार सेनेच्या अनुयायांनी प्रतिस्पर्धी कामगार संघटनांच्या कार्यकर्त्यांवर केलेले हल्ले --

ऑगस्ट व सप्टेंबर १९७४ या दोन महिन्यात कामगार सेनेच्या अनुयायांनी प्रतिस्पर्धी कामगार संघटनांच्या एका अनुयायांवर तीक्ष्ण हत्याराने हल्ला केल्याचे एक प्रकरण बृहन्मुंबईत ऑगस्ट १९७४ मध्ये नोंदविण्यात आले. या प्रकरणात हल्ला झालेल्या व्यक्तीस किरकोळ स्वरुपाची जखम झाली अशा हल्ल्यांची संख्या अति कमी असल्यामुळे शासनाने ज्या ठिकाणी त्याची व्यवस्था असावी लागते त्या ठिकाणी त्या प्रमाणे ती केली आहे. जास्त लागली तर जास्त उपाय योजना करण्यात येईल असे श्री रत्नाप्पा कुंभार यांनी श्री. ग.रा. लोके ( परळ ) यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिले.[१६]

बृहन्मुंबईत छोट्या व्यापाऱ्यांच्या मोर्चावर पोलिसांनी केलेला लाठीमार -

मुंबई महापालिकेवर निदर्शने करणाऱ्या किराणा दुकानदारांच्या मोर्चावर दि.१२-९-७४ रोजी पोलिसांनी लाठीमार केला त्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली होती ? या प्रश्नाला श्री रत्नाप्पा कुंभार व श्री व.पुन.नाईक यांनी उत्तर दिले की, " १२ सप्टेंबर १९७४ रोजी किराणा दुकानदारांनी फिरते न्यायालय रद्द करण्याच्या मागणीसाठी महानगरपालिके - समोर निदर्शने करण्याचे ठरविले असता त्यासाठी २,००० लोकांचा जमाव आझाद मैदानात जमला होता. त्याच वेळी निरनिराळ्या बाजूनी आलेले दोन मोर्चे बृहन्मुंबई महानगरपालिके समोर आले असताना पोलिसांनी त्याना आझाद मैदानावर जाण्याची विनंती केली. परंतु त्यानी तेथे जाण्याचे नाकारले व त्या मोर्चातील लोकांनी महानगरपालिकेच्या मुख्य दरवाजाच्या दिशेने घुसण्याचा प्रयत्न करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्याना अडविण्यासाठी साखळी तयार

केली हे पाहून मोर्चातील लोकांनी आरडाओरड व शिवीगाळ करुन गोंधळ करण्यास सुरुवात केली. त्याच वेळेस आझाद मैदानावर जमलेले लोकही मुख्य रस्त्यावर आले. मोर्चाच्या नेत्यानी जमावापुढे भाषण करण्यास सुरुवात केली. परंतु त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्याच वेळेस जमावाच्या पुढील लोकांनी वक्त्यावर चपला फेकण्यास व दगड फेकण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्यांना समजविण्याचा प्रयत्न केला. परंतु जमावातील लोकांनी ऐकले नाही. उलट त्यानी पोलिसांवर चपला,दगड,नारळाची रिकामी कवचे फेकण्यास सुरुवात केली. काही लोकांनी पोलिस अधिकारी व पोलिसांना घेराव घातला. परिस्थिती आटोक्याबाहेर जाण्याचा संभव दिसून येताच पोलिसांनी परिस्थिती काबूत आणण्यासाठी सौम्य छडीमार केला.[१७]

## बृहन्मुंबईत जादा पोलिस चौक्या उघडण्याबाबत प्रस्ताव --

विधान सभेच्या बैठकीमध्ये राममनोहर त्रिपाठी ( घाटकोपर ) यांनी बृहन्मुंबईत जादा पोलिस चौक्या (ठाणी) उघडण्याच्या प्रस्तावावरील शासनाचा विचाराबाबत चौकशी केली असता --- श्री रत्नाप्पा कुंभार व श्री व.पु. नाईक ह्यानी सांगितले की, बृहन्मुंबईत ७ नवीन पोलिस ठाणी निर्माण करण्याची आवश्यकता आहे असे पोलिस आयुक्त मुंबई यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे. हा प्रस्ताव कार्यान्वित आणण्याकरिता मोठ्या प्रमाणात खर्च येणार असल्यामुळे ही योजना कामाची गरज व प्राधान्य लक्षात घेऊन कमीत कमी ३ टप्प्यात पूर्ण करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्या प्रमाणे पोलिस आयुक्तांनी दोन पोलिस ठाणी निर्माण करण्याचा सविस्तर प्रस्ताव पाठविला आहे. त्यावर शासनाचा विचार चालू आहे. सध्याच्या आर्थिक टंचाई व्यतिरिक्त प्रत्येक पोलिस ठाण्याला आणि तेथील कर्मचाऱ्यांना राहाण्याच्या इमारतीसाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे हे सर्व करावयास काही कालावधी लागणार हे निश्चित आहे. सदर प्रश्नाचा निकाल लागल्यानंतर शासन नवीन पोलिस ठाणी उघडण्याच्या प्रस्तावाला कार्यान्वित करण्याच्या-दृष्टीने अंतिम निर्णय घेऊ शकेल .एका ठाण्यावरील भांडवली खर्च हा २४ लाख रु.आहे. वार्षिक खर्च ८ लाख रुपयांचा आहे. साधन सामुग्रीसाठी येणारा

खर्च हा १$\frac{१}{२}$ लाख रु.आहे व पहिल्या टप्प्याचे काम हे १९७५-७६ ह्या कालावधिमध्ये कार्यान्वित करण्याचा आमचा प्रयत्न राहिल असे सांगितले.[१८]

अनुदानाकरिता पूरक मागण्या गृह विभाग --

राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी गृहखात्याची तरतूद केलेली आहे. राज्यात शांतता टिकविण्यासाठी अत्यंत जागरुक रहावे लागते. यासाठी या खात्याला पोलिस, तुरुंग या सारखे विषय हाताळावे लागतात. त्यादृष्टीने गृहखात्याला ४ डिसेंबर १९७४ रोजी पूरक मागण्या या सभागृहामध्ये सादर करण्यात आल्या या मागण्या पुढीलप्रमाणे -- एकूण १३ बाबींशी संबंधित या मागण्या आहेत. त्यापैकी ८ बाबी ह्या पोलिस खात्यात निरनिराळे विभाग आहेत त्या विभागातील जे कर्मचारी तीन वर्षा पेक्षा जास्त काळ टेंपररी म्हणून होते त्याना कायम करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. उरलेल्या ज्या पाच बाबी आहेत त्यात दोन बाबी ह्या सामान्य स्वरुपाच्या आहेत.रायपूर तालुक्यामध्ये अगोदर एक पोलिस स्टेशन होते परंतु त्या ठिकाणी शहरासाठी आणखी एक पोलिस स्टेशन व तालुक्यासाठी वेगळे पोलिस स्टेशन करण्याचे ठरविल्याने एक पोलिस स्टेशन जास्त काढण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. त्याच प्रमाणे खापरखेडा येथे पूर्वी जी पोलिस चौकी होती त्या पोलिस चौकीचे रुपांतर पोलिस स्टेशनमध्ये करण्यात आले आहे अशी माहिती सभागृहाला रत्नाप्पा कुंभार यांनी दिली.

या प्रमाणेच चोरटा व्यापार, लाचलुचपत, स्मगलिंग याला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र विभाग काढण्याचे शासनाने ठरवले असून हा विभाग १-१०-१९७४ पासून काढला असल्याचे सांगण्यात आले. अशा प्रकारच्या एकूण पुरवणी मागण्या ११ लाख ५१ हजार ४१ रुपयांच्या होतात असे श्री रत्नाप्पा कुंभारांनी स्पष्ट केले.

श्री रत्नाप्पा कुंभारांनी सभागृहात श्री प्रमोद नवलकर यांनी अधिकारी आणि पैसा याबाबत खुलासा विचारला असता सांगितले की, कस्टम खात्यातर्फे

जो माल पकडला जातो त्याला राज्यातील पोलिस मदत करतात त्यातील भाग हा राज्य शासनाला मिळत नाही. रत्नाप्पा कुंभार म्हणतात, जो माल कस्टम अधिकारी पकडतात, त्या मालावर आमचा अधिकार नाही परंतु जो माल राज्य सरकारच्या मदतीने पकडला जातो, त्या मालाच्या ५० टक्के रक्कमही राज्य शासनाला मिळावी अशा प्रकारे या राज्य शासनाने केन्द्र शासनास कळविलेले आहे अशी मागणी केलेली आहे, त्याचा केन्द्रातील संबंधित अधिकारी व राज्याचे संबंधित अधिकारी यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक सब कमिटी नेमून विचार झाला आहे अशा प्रकारे ५० टक्के रक्कम ही राज्य शासनाला मिळावी हे तत्वत: केन्द्राने मान्य केलेले आहे. परंतु त्याचा तपशिल ठरल्यानंतर त्या बाबतीत पुढील व्यवस्था करता येईल हा तपशिल ठरवण्यासाठी वेळ लागू नये म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रयत्न केल्याचे त्यानी सांगितले.[१९]

श्री रत्नाप्पा कुंभार यांचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून कार्य --

( फेब्रुवारी १९७५ ते मे १९७७ )

श्री रत्नाप्पा कुंभार यांनी गृहमंत्रि पदाची सूत्रे समर्थपणे सांभाळून राज्यात कायदा व शांतता आणि सुव्यवस्था चांगली राखली. त्यामुळे मुख्यमंत्री श्री शंकरराव चव्हाण यांनी आपल्या मंत्रिमंडळात अन्न व नागरी पुरवठा खात्याची धूरा सांभाळण्याची जबाबदारी श्री रत्नाप्पा कुंभार यांचेकडे सोपवली. व त्या खात्याचा कारभार त्यानी यशस्वीपणे साभाळला. या संबंधी विधान सभेमध्ये जी प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी श्री रत्नाप्पा कुंभार यांनी समर्थपणे जे स्पष्टीकरण दिले त्यातील काही उदाहरणे पुढीलप्रमाणे ---

श्री रत्नाप्पा कुंभारानी आपल्या कारकिर्दीत केलेल्या मागण्या --

श्री रत्नाप्पा कुंभारांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री असताना ज्या विविध मागण्या केल्या त्या पुढीलप्रमाणे ---

२६६, निवृत्ती वेतने व इतर सेवानिवृत्ती लाभ --

श्री रत्नाप्पा कुंभार यांनी मुख्यलेखा शीर्ष २६६ निवृत्ती वेतने व इतर सेवानिवृत्ती लाभ या खाली मागणी क्रमांक १४६ या खाली १००० रु.मागणी केली.

२९६ सचिवालय आर्थिक योजना --

मुख्य लेखा शीर्ष २९६ सचिवालय,आर्थिक सेवा या खाली मागणी क्रमांक १४७ या खाली १३,२०,००० रु.मागणी केली.

३०९ अन्न व पोषण आहार --

मुख्य लेखा शीर्ष ३०९,अन्न व पोषण आहार याखाली मागणी क्रमांक १४८ या खाली ४०,३५,७०० रु.मागणी केली.

५०९ अन्न व पोषण आहार यावरील भांडवली खर्च --

मुख्य लेखा शीर्ष ५०९,अन्न व पोषण आहार यावरील भांडवली खर्च या खाली मागणी क्रमांक १९१ या खाली ५,१८,३३,६६,००० रुपयांची मागणी केली.

७६६ शासकीय कर्मचा-यांना कर्जे --

मुख्य लेखा शीर्ष ७६६ शासकीय कर्मचा-यांना कर्जे या खाली क्रमांक २४० या खाली २,००,००० रु.मागणी केली.[२०]

अनुदानाकरिता मागण्या - अन्न व नागरी पुरवठा विभाग --

अन्न आणि नागरी पुरवठा खात्याच्या मागण्याबाबत सभागृहात चर्चा होत असताना अनेक सदस्यांनी अन्नधान्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी अनेक महत्वाच्या सूचना केल्या. अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनीच खास प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे याची जाणीव सर्व सदस्यांना अन्न व नागरी

पुरवठा मंत्र्यानी केली. तसेच या मागण्यामध्ये धान्य अगर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, त्याचे भाव आणि वितरण होण्याच्या तीन महत्वाच्या सूचना केल्या. अशा वेळी श्री रत्नाप्पा कुंभारांनी स्पष्ट केले की, जीवनावश्यक वस्तू रेशन दुकानातून ज्या दिल्या जातात त्याचे भाव जे ठरविले जातात ते लेव्हीच्या धान्याची वसूली होते त्या धान्यासाठी जो पैसा शासन खर्च करते म्हणजेच त्याच्यावर जो खर्च येतो याचा विचारकरुन " ना नफा ना तोटा " या इकॉनॉमिक प्राईझाने त्या मालाचा दर ठरविला जातो. [२१]

<u>मुंबई शिधावाटप क्षेत्रातील निर्देशक योजनेसंबंधी अन्न व नागरी पुरवठा मंत्र्याचे नियम ४६ अन्वये निवेदन --</u>

श्री रत्नाप्पा कुंभार ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) यांनीस्पष्ट केले की, मुंबई, शिधावाटप क्षेत्रात शिधावाटप नियंत्रण एप्रिल १९६६ पासून सुरु आहे. शक्यतोवर कार्डधारकांना आपली कार्डे आपल्या पसंतीच्या शिधा-वाटप दुकानात नोंदवून घ्यावयाचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. शिधावाटप क्षेत्राच्या कांही भागात सुरुवातीला सुयोग्य अशी शिधावाटप दुकाने नव्हती. याचा परिणाम उपलब्ध असलेल्या काही दुकानात प्रमाणाबाहेर कार्डांची नोंदणी होण्यात झाला. आणि त्यामुळे कार्डधारकांना कमाली गैरसोय सोसावी लागली. शिधापत्रिकांच्या प्रमाणाबाहेर नोंदणीमुळे शिधावाटप दुकानांवर पर्यवेक्षण वगैरेच्या सहाय्याने आवश्यक ते नियंत्रण ठेवणे कठीण होवून बसले.

२. अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यानी फेब्रुवारी १९७५ मध्ये आणि माननीय मुख्य मंत्र्यानी जुलै १९७५ मध्ये बनावट कार्डे परत करण्यासंबंधी जी आव्हाने केली व त्याला जो चांगला प्रतिसाद मिळाला. त्या शिवाय बनावट शिधापत्रक व इतर शिधापत्रकांवरील बनावट एकांके ( युनिट्स ) मोठ्या प्रमाणात नष्ट करण्याकरिता आणि शिधावाटप नियंत्रणाची पुनर्रचना करुन शिधापत्रकांच्या शिधावाटप दुकानातील नोंदणीचे सुसूत्रीकरण करण्याचा मुळ हेतूने शासनाने मुंबई शिधावाटप क्षेत्रात एक निर्देशक योजना(मास्टर प्लॅन )

अंमलांत आणण्याचे ठरविले. यायोजनेचे सर्वसाधारण स्वरुप म्हणजे अस्सल शिधा पत्र धारकांनी भरलेली प्रतिज्ञापत्रे घरोघरी जाऊन तपासल्यानंतर व त्याची छाननी केल्यानंतर बनावट शिधापत्रिका व शिधापत्रकावरील बनावट एकांके रद्द करावयाची आणि उरलेल्या अस्सल शिधापत्रिका निरनिराळ्या दुकानांत एकाच इमारतीत किंवा वस्तीत वा रस्त्याला लागून एकत्र राहाणाऱ्या कार्ड - धारकांच्या शिधापत्रिका एकाच दुकानात, धान्य, साखर व इतर उपलब्ध जीवनावश्यक वस्तु मिळविण्याकरिता जोडावयाचा असे आहे असे करताना शिधावाटप दुकानदारांना त्यांच्या दुकानात ८,००० हून अधिक एकांके असलेल्या शिधापत्रिका नोंदविता येणार नाही.[२२]

विधान सभेमध्ये श्री.न.ना.बाशीकर यांनी प्रश्न विचारला की, मंत्री महोदयांनी कंझ्युमर्स को.ऑप.स्टोअर्सना असे आश्वासन दिले आहे का की, ज्या बेसिक गोष्टी आहेत, त्या ५.१० टक्के प्रमाणात उत्पादकांकडून ताब्यात घेऊन त्याचे वाटप करण्यात येईल ?

रत्नाप्पा कुंभार यांनी सांगितले की, जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत असे आश्वासन दिले आहे. परंतु तेलाच्या बाबतीत वाटप होऊ शकले नाही कारण महाराष्ट्रात भुईमुगाचे उत्पादन कमी आहे, त्यामुळे महाराष्ट्रात कारखानदारांकडून माल घेऊन त्याचे वाटप करु शकलो नाही. परंतु केन्द्र सरकारने बाहेरुन जे तेल मागविले आहे त्यामुळे आज तेलाचे दर कमी होतील तसेच श्रीमती शैलजा शिरोळे यांच्या शिफारशीनुसार तेलाची टंचाई कमी करण्यासाठी करडई, भुईमूग यांचे उत्पादन वाढविण्याचे त्यांनी आश्वासन दिले.[२३]

<u>साठेबाज, काळाबाजार व नफेखोर यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत केन्द्र शासनाने राज्य शासनास केलेल्या सूचना --</u>

केन्द्र शासनाने साठेबाज, नफेखोर व काळा-बाजारवाले यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यासाठी काही महत्वाच्या सूचना राज्य शासनाला केल्या त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे ---

वस्तूंचे भाव स्थिर राखण्यासाठी व जीवनावश्यक वस्तू योग्य दरात ग्राहकांना मिळण्यासाठी सर्व तऱ्हेची उपाय योजना करण्यासंबंधी, तसेच काळाबाजार- वाले, नफेबाज व्यापारी यांनी कृत्रिम टंचाई निर्माण करून गैरफायदा घेऊ नये म्हणून विशेष लक्ष देण्यासंबंधी व अशा लोकां विरुध्द अंतर्गत सुरक्षा व भारत संरक्षण कायद्याखाली कठोर कारवाई करण्यासंबंधीच्या सर्वसाधारण सूचना केन्द्र शासनाने राज्य शासनास केल्या आहेत. त्याचप्रमाणे डिस्प्ले ऑफ प्राईसेस ॲण्ड स्टॉक्स व पॅकेज कमोडिटीज ( रेग्युलेशन ) च्या आदेशाचे व्यवस्थित पालन करण्याच्या विषयी सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर सूचनांच्या अंमलबजावणीबाबत शासनाची भूमिका स्पष्ट करताना श्री रत्नाप्पा कुंभार म्हणाले की केन्द्र शासनाच्या सूचनांनुसार भावपातळीवर व जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठयासंबंधात विशेष लक्ष देण्या - बाबतचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यादृष्टीने डिस्प्ले ऑफ प्राईसेस ॲण्ड स्टॉक्स व पॅकेज कमोडिटीज ( रेग्युलेशन ) च्या आदेशाची व इतर सर्व अन्नधान्य नियंत्रण आदेशाची कडक अंमलबजावणी करण्या विषयीच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. काळाबाजार, नफेबाजी, साठेबाजी, या सारख्या समाज विघातक गैर व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या बाबतीत विशेष जागृतीने लक्ष देण्याच्या व त्यांच्याविरुध्द अंतर्गत सुरक्षा व भारत संरक्षण कायद्याखाली कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. निरनिराळ्या वस्तूंचे उत्पादक, व्यापारी, ग्राहक यांच्या प्रतिनिधिंच्या वेळोवेळी बैठका घेऊन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरक्षित ठेवण्याकरिता व भाव पातळी स्थिर राखण्याकरिता त्यांना शिस्तपालनाची समज देण्यात आली. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत नियंत्रित अन्नधान्ये व इतर वस्तू यांचा पुरवठा सुरळीतरित्या व नियमितपणे चालू ठेवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना बजावण्यात आले आहे. वरीलप्रमाणेच ग्राहक सहकारी संस्था मार्फत सवलतीच्या दराने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करता यावे या उद्देश्याने राज्यातील निरनिराळ्या ग्राहक सहकारी संस्थाना प्रत्यक्ष उत्पादकांकडून जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शासन करीत आहे.[२४]

## गोडे तेल व शेंगदाणा तेलावरील विक्रीकरात सूट --

सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या वेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना पुढील काही प्रश्न विचारले ---

१) सार्वजनिक वितरण यंत्रणेमार्फत विक्रीकरण्यात येणारे गोडेतेल, शेंगदाणा तेलास विक्रीकरातून सूट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे का ? सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

२) त्याची अंमल बजावणी केव्हा पासून करण्यात येणार आहे ?

३) उक्त निर्णय किरकोळ तेल विक्रीसाठी लागू आहे काय ?

वरील प्रश्नाना उत्तर देताना रत्नाप्पा कुंभार म्हणाले , महाराष्ट्र शासनाने गुजरात ॲग्रो इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनमार्फत शेंगदाणा तेलाची खरेदी केली आहे. प्रस्तुत संस्था बॉम्बेसेल्स टॅक्स ॲक्ट १९५९ अन्वये अधिकृत विक्रेती आहे. गुजरात मधून मिळणारे तेल वरील कॉर्पोरेशन तर्फे मुंबईत आणण्यात येते व त्यावर ३ टक्के दराने स्थानिक विक्रीकर द्यावा लागतो हे तेल विक्रीकर कायद्यान्वये नोंदणीकृत विक्रेत्या मार्फत परस्पर विक्री केल्यास पुन: विक्रीकर भरावा लागत नाही. तथापि अन्न व नागरी पुरवठा विभाग विक्रीकर कायद्याखाली नोंदणीकृत विक्रेता नाही आणि म्हणून शासनाने प्रस्तुत संस्थेकडून तेल विकत घेऊन त्याची अधिकृत शिधावाटप दुकानातून तेलाची विक्री करावयाची ठरवल्यास त्या विक्रीवर पुन्हा विक्रीकर भरावा लागतो. यासाठी एकाच तेलाच्या विक्रीवर दोनदा विक्रीकराचा बोजा पडून ग्राहकांना तेल महागात पडू नये म्हणून जो दुसऱ्या टप्प्यावर विक्रीकर भरावा लागतो तो देण्याच्या बाबतीत सूट देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाकडून खरेदी केल्या जाणाऱ्या शेंगदाणा तेलापुरता हा निर्णय मर्यादित आहे. [२५]

## जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यासाठी राज्य शासनाने आखलेली एक खास योजना --

सभागृहातील सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना श्री रत्नाप्पा कुंभारांनी सांगितले की, ग्राहकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यासाठी शासनाने जी योजना कार्यान्वित आणली ती पुढील प्रमाणे -- जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दराने उपलब्ध व्हाव्यात म्हणून निरनिराळ्या कारखान्यातून तयार होणाऱ्या वस्तूंचे सहकारी संस्थाद्वारे वाटप करण्याची एक अनौपचारिक योजना कार्यान्वित करण्यात येत असून त्याकरिता प्रत्यक्ष उत्पादक कारखानदारांकडून त्यांच्या उत्पादित वस्तू त्यांच्या खाजगी वितरकांना ज्या दराने व सवलतीने पुरविल्या जातात त्याच दराने व सवलतीने त्या निरनिराळ्या ग्राहक सहकारी भांडारांना उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. या योजनेखाली आतापर्यन्त २८ उत्पादकांनी आपला माल सहकारी भांडारांना देण्याचे मान्य केले असून त्याकरिता राज्यातील एकूण ९७ ग्राहक सहकारी भांडारांना घाऊक एजंट म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहेत. किरकोळ विक्रीचे काम सहकारी संस्थानी किरकोळ विक्रीची दुकाने, सहकारी संस्थाची स्वस्त धान्य दुकाने तसेच निर्मंत्रित कापड विक्री दुकाने यांच्या मार्फत करण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी मुंबईत प्रथम फेब्रुवारी १९७६ मध्ये सुरु करण्यात आली व त्यानंतर सर्व जिल्ह्यातही विस्तार करण्यात आला आहे.[२६]

## स्वस्त धान्य दुकांनाची फेर रचना--

१९५७ सालापासून महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित असलेल्या सार्वजनिक वितरण संस्थेकरिता स्वस्त धान्य दुकाने देताना सहकारसंस्था तसेच मागासवर्गीय व अनुसूचित जाती जमातीचे समासद, माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिक तसेच सुशिक्षित बेकार यांना स्वस्त धान्य दुकाने देण्याचा अग्रक्रम यादीत उच्च स्थान देऊन सुध्दा सध्या चालू असलेल्या सुमारे ३०,००० दुकानां पैकी

५० टक्क्याहून जास्त दुकाने अशा यादीत सर्वात शेवटचा क्रम असलेल्या खाजगी व्यापाऱ्याकडे आहेत. त्याशिवाय, एकाच कुटुंबातील अनेक व्यक्तींकडे अनेक दुकाने असणे, सहकारी संस्थास नाममात्र पुढे करून खाजगी व्यापाऱ्यांनी त्याची दुकाने चालविणे, त्याचप्रमाणे मागासवर्गीय, स्वातंत्र्य सैनिक वगैरेंची दुकाने त्यांच्या दुकानात भागिदारी करून खाजगी व्यापाऱ्यांनी मिळवले अशा तऱ्हेचे अनेक प्रकार वर उल्लेख केलेल्या वितरण संस्थेत आढळून आले. या सर्वांचे आमूलाग्र उच्चाटन करण्याच्या हेतूने शासनाने तारीख २९ डिसेंबर १९७६ ला एक वैधानिक हुकूम काढून राज्यात अस्तित्वात असलेली सर्व शिधावाटप दुकाने । स्वस्त धान्य दुकाने तारीख १ जानेवारी १९७७ ला रद्द केली व त्याच वेळी असे आदेश दिले की ही दुकाने नव्या अग्रक्रम यादीनुसार परत दिली जाईपर्यन्त ती त्या तारखेला ज्या व्यक्तींकडे व संस्थेकडे असतील, त्यानीच ती वैधानिक जबाबदारी घेऊन तशीच पुढे ठेवावीत अशा तऱ्हेने दुकाने पुन्हा देण्याकरिता आवश्यक ते अर्जसुध्दा संबंधिताकडून तारीख १० मार्च १९७७ पर्यन्त मागविण्यात आले, असल्याचा खुलासा श्री रत्नाप्पा कुंभार यांनी सभागृहात दिला.[२७]

## मुंबई शहरात गोड्या तेलाची झालेली तीव्र टंचाई ---

मुंबई शहरात गोड्या तेलाची टंचाई निर्माण होऊन त्याचे भाव वाढले त्याची कारणे कोणती ? व ही टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने काय प्रयत्न वा उपाय योजना केल्या आहेत ? असा प्रश्न स.दा.मंडलिक (कागल ) यांनी अन्न व नागरीपुरवठा मंत्री यांना विचारला असता श्री रत्नाप्पा कुंभार यांनी संबंधित प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की मुंबई शहरात गुजरात राज्यातून शेंगदाणा तेलाची आवक होते. गुजरात शासनाच्या तेल विषयक अनिश्चित धोरणामुळे त्या राज्यातून मुंबई शहरात होणारी तेलाची आवक जानेवारी १९७७ मध्ये बरीच कमी झाली त्यामुळे काही प्रमाणात गोड्या तेलाचे भाव वाढले.

गुजरात राज्यातून अधिक तेल सुरळीतपणे मिळविण्याच्यादृष्टीने केन्द्र शासन व गुजरात शासन यांच्याशी सततसंपर्क ठेवण्यात आला असून स्टेट ट्रेनिंग कार्पोरेशन कडून आयात केलेले ५०० टन राईचे तेल शुध्द करून प्रति किलोस रु.७-३० या दराने बृहन्मुंबईमध्ये ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे स्पष्ट केले.[२८]

राज्यातील खाद्यतेले व वनस्पती तुपाचे भावात होणारी वाढ रोखण्याबाबत शासनाचे धोरण ---

सभागृहात प्रश्नोत्तराच्या वेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना खाद्य तेलाच्या दरामध्ये झालेली वाढ व त्याची कारणे विचारली असता श्री रत्नाप्पा कुंभार यांनी सांगितले की राज्य शासनाने मध्यवर्ती शासनाकडून मिळालेले आयात केलेल्या राईचे तेल शुध्द करून त्याचे वितरण करण्याची व्यवस्था केली आहे ही व्यवस्था राईच्या तेलाच्या उपलब्धतेनुसार आवश्यक वाटेल तेव्हा चालू ठेवण्यात येईल.[२९]

१९७६-७७ वर्षातील एकाधिकार धान्य खरेदीचे धोरण---

विधान सभेमध्ये अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना पुढील गोष्टींचा खुलासा विचारला ---

१) सन १९७६-७७ या वर्षातील एकाधिकार धान्य खरेदीचे शासनाचे धोरण काय आहे ?

२) या धोरणामुळे संकरित ज्वारी खरेदी करावयाची नाही असा शासनाचा निर्णय झालेला आहे काय ? असल्यास कोणत्या कारणास्तव - या प्रश्नाची उत्तरे देताना श्री रत्नाप्पा कुंभार म्हणतात -- १९७६-७७ च्या हंगामातील शासनाच्या लेव्ही वसुलीच्या धोरणाचे सर्व साधारण स्वरुप खालील प्रमाणे आहे :----

अ) शेतकऱ्यांनी धारण केलेल्या एकूण जमिनीवर लेव्ही बसविण्याचे लेव्हीची आकारणी निव्वळ ( सर्व रोख सोडून ) जमीन महसुलानुसार करण्याचे आणि भाताखालील व ओलिता खालील जमिनीत लेव्ही आकारणीसाठी ठराविक अधिभार लावण्याचे १९७५-७६ च्या हंगामातील धोरण १९७६-७७ च्या हंगामातही चालू ठेवण्याचे शासनाने ठरविले आहे.

ब) लेव्ही हंगामात एकदाच ( खरीप किंवा रबी ) वसूल होणार आहे.

क) पंधरा रुपये किंवा त्या पेक्षा कमी लेव्ही योग्य जमीन महसूल भरणारे एक व्यक्ती कुटुंबातले शेतकरी लेव्हीमधून वगळण्यात आलेले आहेत.

ड) नारळ, सुपारी, काजू, संत्री, मोसंबी, लिंबू, आंबे व चिकू यांच्या बागा खालील जमिनीवर लेव्हीची आकारणी फळझाडांना फळे येण्यास सुरुवात होईल तेव्हा पासून करण्यात येणार आहे.

इ) ' वरकस ' म्हणून नोंदण्यात आलेल्या जमिनीवर संपूर्ण लेव्ही सूट देण्याचे शासनाने ठरविले आहे.

ई) ज्या गावाची पिकांची अंतिम आणेवारी ४ आण्या पेक्षा कमी झाली असेल त्या गावातील कोरडवाहू जमिनीवर संपूर्ण लेव्ही सूट दिली जाते व ज्या गावांचीपिकांची अंतिम आणेवारी ४ आण्यापेक्षाजास्त परंतु ६ आण्यापेक्षा कमी जाहिर झाली असेल त्या गावातील कोरडवाहू जमिनीवर ५० टक्के लेव्ही आकारण्यात येते.

एन) जमीन महसूलच्या आकारणीतील फरकामुळे लेव्ही आकारणीत होणारी तफावत कमी करण्याच्यादृष्टीने लेव्ही आकारणीसाठी जो निव्वळ महसूल लक्षात घेतला जातो त्याचे बाबतीत खालीलप्रमाणे कमाल मर्यादा केलेल्या आहेत ---

१) प्रत्यक्ष भाताखाली जमीन व खाली नमूद केलेल्या बागायती जमिनी सोडून इतर सर्व जमिनीचे बाबतीत प्रति एकरी रुपये ३ (तीन)

२) प्रत्यक्ष भाताखालील जमिनीचे बाबतीत प्रति एकरी रुपये ७ ( सात )

३) नारळ, सुपारी, काजू, आणि आंबे यांच्या बागाखाली जमिनीचे बाबतीत प्रति एकरी रुपये १० ( दहा )

वर नमूद केलेले दर हे कमाल दर आहेत. जमिनीचा निव्वळ महसूल प्रत्यक्षात त्या दरा पेक्षा कमी असल्यास जो प्रत्यक्ष महसूल असेल तोच लेव्ही आकारणीसाठी लक्षात घेतला जाईल फक्त भाताखालील जमिनीच्या बाबतीत किमान निव्वळ जमिन महसूल दर एकरी रु. ३ (तीन ) गृहित धरता येईल. [३०]

जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ --

सभागृहातील काही सदस्यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थीर ठेवण्याचे दृष्टीने कोणती उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहे याचाखुलासा विचारला असता श्री रत्नाप्पा कुंभारांनी स्पष्ट केले की, भाववाढ रोखण्याची उपाय योजना केवळ महाराष्ट्रा - पुरतीच मर्यादित नसून ती अखिल भारतीय स्वरुपाची आहे. त्या दृष्टीने केन्द्र शासनाने पतपुरवठ्यावरील नियंत्रण, चोरटी आयात निर्यात व साठेबाजी करण्याविरुध्द मोहिम, काळा पैसा शोधून काढणे, भावसाठे दर्शविण्या बाबतच्या आदेशाची कडक अंमलबजावणी करणे, बंद पुड्यातील वस्तुचे नियंत्रण करणारा आदेश काढणे इ. उपाय योजिले आहेत.

उपहारगृह, खाणावळीचे चालक, फरसाणा ,व्यापारी, दुध व्यवसायातील व्यापारी व घाऊक व किरकोळ व्यापारी यांच्या वेगवेगळ्या बैठका घेऊन भाववाढ कमी करण्याबाबत त्यांना आवाहन करण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी नफ्याचे प्रमाण खाली आणले. जिल्हामधूनही अशाच तऱ्हेचे प्रयत्न करुन भाव कमी करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

व्यापाऱ्यानी साठेबाजी व कृत्रीम भाववाढ करु नये ह्या साठी महाराष्ट्र शेड्युल्ड अर्टिकल अँण्ड मार्किटिंग ऑफन प्रायसेस ऑर्डर १९६६ ची कडक अंमलबजावणी करण्यात आली आहे.

साठेबाजी, काळाबाजार या सारख्या गैर व्यवहाराच्या बाबतीत सन १९७१ च्या भारत संरक्षण कायदा व मिसा चा कायद्यातील तरतुदींचा वापर करण्याची सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व जिल्हा पोलिस प्रमुखांना दिल्या आहेत. निरनिराळ्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा ग्राहकांना सवलतीच्या दराने करण्याच्या उद्देश्याने राज्यातील ग्राहक सहकारी भांडारांना उत्पादकांकडून त्यांच्या वितरणाच्या पहिल्या दराने पुरवठा करण्याची योजना सुरु करण्यात आली असून मुंबई तसेच सर्व जिल्ह्यात या योजनेची कार्यवाही सुरु झाली आहे. या योजनेनुसार ग्राहकांना वनस्पती, रेझार ब्लेडस, साबण, बिस्किटे, चहा इ. २५ नित्योपयोगी वस्तू सवलतीने मिळू शकतील. या योजनेखाली एकूण २८ उत्पादकांनी त्यांच्या वस्तू सहकारी संस्थाना देण्याचे मान्य केले आहे. त्याकरिता ९५ सहकारी संस्थाना नामनिर्देश केले आहे.[31]

श्री रत्नाप्पा कुंभार यांचे नगर विकास मंत्री म्हणून कार्य --

( मे १९७७ ते मार्च १९७८ )

अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून आण्णाची कारकिर्द यशस्वी झाली व ते नंतर श्री वसंतदादा पाटील यांच्या मंत्री मंडळात नगर विकास मंत्री ह्या अवघड विभाग खात्याचे मंत्री झाले.

औद्योगिकरणामुळे रोजगार मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकार शहराकडे धाव घेतात, त्यामुळे शहरिकरणाची समस्या निर्माण झाली. शहरातील निवासस्थाने, अन्न, आरोग्य, प्रदुषण, पाणीपुरवठा, वीज, शाळा इ. विकास करण्यासाठी महाराष्ट्रात नगरविकास खाते निर्माण केले आहे. या खात्यामार्फत नगरपालिका, महानगरपालिका,

निवडणूका घेणे, बरखास्ती, गैर कारभार, भ्रष्टाचार, चौकशी , पालिका कर्मचा-यांसंबंधी सेवा, अटी, नियंत्रण, घरपट्टी, कर,उत्पन्न, सापनसफाई इ. बाबत नियंत्रण, नगरपालिका, शाळा, गृहनिर्माण, मास्टर प्लॅन, रुग्णालये, जुन्या मोडकळीस आलेल्या घरांची पुनर्बांधणी करण्यासाठी नियंत्रण, वाहतूकीसाठी रस्ते व लोहमार्ग इ. कार्ये या खात्यामार्फत केली जातात.

श्री रत्नाप्पा कुंभार यांनी नगरविकास मंत्री म्हणून आपल्या कारकिर्दित काही नागरी गुंतागूंतीची प्रकरणे यशस्वीपणे हाताळली ती पुढील प्रमाणे ---

महाराष्ट्र राज्य पाणी-पुरवठा व भुयारी गटार योजना --

विधान सभेत काही सदस्यानी महाराष्ट्र राज्य पाणी-पुरवठा व भुयारी गटार योजना मंडळाची स्थापना केव्हा केली व या महामंडळाच्या कार्याची रुपरेखा काय आहे या बाबत स्पष्टीकरण विचारले असता रत्नाप्पा कुंभारांनी पुढीलप्रमाणे तत्संबंधी माहिती सभागृहाला दिली.

१) महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व भुयारी गटार योजना मंडळाची स्थापना १ जानेवारी १९७० पासून करण्यात आली आहे.

२) सदरहू महामंडळाची कार्याची रुपरेषा पुढील प्रमाणे आहे ---

अ) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण व मलनि:स्सारण योजना तयार करणे व कार्यान्वित करणे, विकास करणे आणि अशा योजनासाठी निधी उपलब्ध करणे.

ब) पाणीपुरवठा व जलनि:स्सारण योजनाबाबत राज्य सरकार व स्थानिक संस्थाना आपण विनंती केल्यास खाजगी संस्थाना अगर व्यक्तींना सर्व त-हेची मदत करणे.

क) राज्य शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे पाणीपुरवठा केन्द्र व जलनि:स्सारण व्यवस्था चालवणे व देखभाल करणे.

प्राथमिक अवस्थेत हे मंडळ भुयारी नागरी पाणीपुरवठा व गटार योजनाना वित्तीय सहाय्य करणारी संस्था म्हणून कार्य करणार आहे.[३२]

राज्यातील नगरपालिकांच्या निवडणूका --

राज्यातील २४ नगरपालिकावर प्रशासकीय कारभार चालू असून तीन नगरपालिका विघटित करण्यात आल्या असून तेथे प्रभारी अधिकारी कारभार पहात आहेत अशी माहिती श्री रत्नाप्पा कुंभार यांनी दिली.

तसेच आणीबाणी संपल्यानंतर ३० सप्टेंबर १९७७ पर्यन्त ज्या निवडणूका घ्यावयाच्या आहेत त्या घेण्यात येतील असे रत्नाप्पा कुंभार यांनी सभागृहात स्पष्ट केले.[३३]

कोल्हापूर महानगरपालिकेची निवडणूक न घेण्याची कारणे --

सभागृहात नगरविकास मंत्र्याना काही प्रश्न विचारले ते पुढील प्रमाणे --

१) कोल्हापूर महानगरपालिकेवर गेले ४ वर्षे प्रशासकाचा कारभार चालू आहे हे खरे आहे काय ?

२) असल्यास, सदरहू महानगरपालिका जनतेच्या प्रतिनिधि कडे सोपविण्यासाठी तेथे अद्याप निवडणूका न घेण्याची सर्वसाधारणपणे कारणे काय आहेत ?

वरील प्रश्नांना समर्थपणे उत्तर देताना रत्नाप्पा कुंभार म्हणाले की ---

कोल्हापूर नगरपालिकेचे दिनांक १५ डिसेंबर १९७२ रोजी महानगरपालिकेत रुपांतर झाले नंतर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार तेथे प्रशासक नेमण्यात आला. या प्रशासकाची मुदत तीन वर्षा पर्यन्त म्हणजे दिनांक १४ सप्टेंबर १९७५ पर्यन्त होती. परंतु ही मुदत संपण्यापूर्वी महाराष्ट्र म्युनिसिपल कौन्सिल व म्युनिसिपल कॉरपोरेशन्स ( पोस्टपोनमेन्ट ऑफ इलेक्शन ड्युरींग इमर्जेन्सी ) ॲक्ट १९७५ दिनांक १८ सप्टेंबर १९७५ रोजी अंमलात आला. या अधिनियमातील तरतुदीनुसार हा अधिनियम अंमलात असेपर्यन्त या निवडणूका घेता येत नाहीत.[३४]

हिंगोली ( जिल्हा परभणी ) येथील नगरपरिषद बरखास्त करुन शासन नेमण्याबाबतचे एक निवेदन --

हिंगोली ( जिल्हा परभणी ) येथील नगरपरिषद बरखास्त करुन प्रशासक नेमण्याबाबतचे एक निवेदन मा. मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री, यांचेकडे देण्यात नागरिकांनी दिनांक १३ जानेवारी १९७७ रोजी पाठवले असता त्यावर संबंधित चौकशी करुन नगरपरिषदेवर शासनाने नगरपरिषद बरखास्त का करु नये म्हणून शो कॉज नोटिस बजावली आहे कारण सन १९७५-७६ या वर्षात सिमेन्ट रोडची जी बांधकामे हाती घेऊन पूर्ण करण्यात आली ती निकृष्ट दर्जाची झाली म्हणून यास सर्वस्वी नगरपरिषद जबाबदार आहे हा आरोप हिंगोली नगरपरिषदेवर ठेवण्यात आला.[३५]

सोलापूरच्या बार्शी महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी जबरदस्तीने केलेल्या नसबंदी शस्त्रक्रिया संबंधी चौकशी ---

विधान सभेत काही सदस्यांनी सोलापूर बार्शी महानगर पालिका संबंधी काही प्रश्न विचारले व त्याला समर्पक अशी उत्तरे श्री रत्नाप्पा कुंभारांनी दिली त्याचा आढावा पुढील प्रमाणे ---

१) सोलापूर जिल्ह्यातील बार्शी नगरपालिकेच्या कर्मचा-याकडून दशक मोहोत्सवानिमित्त कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया जबरदस्तीने करण्याबाबत चौकशी करण्यात आली आहे हे खरे आहे काय ?

२) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार म्हणाले की -
चौकशीत पुढील प्रमाणे आढळले आहे ---

१) १. शस्त्रक्रिया शिबिरात लोकांना सक्तीने शिबिरात आणले.

२. कुंदांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

३. ज्या व्यक्तीवर एकदा नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली त्याच्यावर पुन: शस्त्रक्रिया करण्यात आली.

या गैरप्रकारास जबाबदार असणा-या मुख्याधिकारी व्यतिरिक्त इतर नगरपालिका कर्मचा-या विरुध्द कारवाई करणेबाबत आदेश देण्यात आले. तसेच मुख्याधिकारी बार्शी, नगरपालिका यांना त्यांच्या मुळ खात्याकडे परत पाठवण्यात यावे व त्यांच्या विरुध्द खाते निहाय चौकशी - असे जिल्हाधिकारी सोलापूर यांना कळविण्यात आले.[36]

लोणावळा व तळेगाव - दाभाडे पाणीपुरवठा योजना --

लोणावळा व तळेगाव पाणी पुरवठा योजना बाबत सभागृहात काही प्रश्न नगरविकास मंत्र्यांना विचारली असता श्री रत्नाप्पा कुंभार यांनी त्याचा खुलासा पुढील प्रमाणे केला ---

(१) लोणावळा व तळेगाव दाभाडे ( जिल्हा पुणे ) येथील नळ पाणी - पुरवठा योजना शासनाने मंजूरी दिली आहे हे खरे आहे काय ?

(२) असल्यास या योजना किती रकमेच्या आहेत व ही रक्कम कशी उपलब्ध करण्यात येणार आहे.

(३) सदर काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल ?

श्री रत्नाप्पा कुंभारांनी सांगितले की ---

१. (अ) लोणावळा पाणीपुरवठा योजना रुपये १,०८,९९,००० निव्वळ किंवा रु. ८९,७८,००० ढोबळ ( १८.५ टक्के हत्यारे व आवजारे सहित ) असून त्यापैकी ३५,२२,२०० निव्वळ किंवा रुपये ४१,७३,८०० ढोबळ भाग १ योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्यात आली आहे.

(ब) तळेगाव-दाभाडे पाणीपुरवठा योजना रु. ७५,७६,३०० निव्वळ किंवा रु. ८९,७८,००० ढोबळ (१८.५ टक्के हत्यारे व आवजारेसहित ) असून त्यापैकी रु. २०,१४,२०० निव्वळ किंवा रु. २३,८७,००० ढोबळ भाग-१ योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्यात आली आहे.

वरील दोन्ही योजनांवरील खर्चाची आर्थिक विभागणी खालील प्रमाणे आहे ---

१. नगरपरिषादेची लोक वर्गणी १० टक्के
२. कर्ज ४० टक्के.
३. शासकीय अनुदान ५० टक्के.

शासकीय अनुदानाची तरतुद जिल्हा नियोजन मंडळामार्फत करावयाची आहे. नगरपरिषादांनी त्यांची १० टक्के लोक वर्गणी देण्याचे कबूल केले आहे. लोणावळा नगरपरिषादेने त्यांच्या कर्जापोटी लागणारी रक्कमही देण्याचे मान्य केले आहे. तळेगाव नगरपरिषादेने त्याना कर्ज मिळवून देण्याकरिता शासनास विनंती केली आहे. त्यांची विनंती शासनाच्या विचाराधीन आहे.

२. नगरपालिका व जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून पुरेसा पैसा उपलब्ध झाल्यास या योजना मार्च १९७९ पर्यन्त पूर्ण करण्यात येतील.[३७]

नवीन मुंबईत सिडकोने काढलेले रुग्णालय --

सभागृहामध्ये काही सदस्यानी नगर विकास मंत्र्याना नवीन मुंबईत सिडकोने काढलेले रुग्णालयाबाबत काही प्रश्न विचारले असता श्री रत्नाप्पा कुंभारानी सांगितले की, सिडकोने रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी व तिच्या विद्युत उपकरणासाठी त्यातील फर्निचर व उपकरणासाठी एकूण ३०.४० लाख रुपयांची तरतूद केली असून त्या पैकी २९,२१,९०६ रु. खर्च झाला आहे. १ डिसेंबर १९७५ पासून रुग्णालयाला सुरुवात करण्यात आली आहे. सिडकोने आपली जबाबदारी टाळलेली नाही ती घरे बांधून लोकांना विकते जमिनी देते तशाच प्रकारे हॉस्पिटलची व्यवस्था करुन चालवण्यास दिलेले आहे.[३८]

पुणे - घोरपडी रेल्वे हद्दी जवळ गावाला पाणीपुरवठा करण्याची योजना --

पुणे - घोरपडी गाव रेल्वे हद्दी शेजारील सुमारे ३०० कुटूंबे असलेले झोपडपट्टी भागाचा समावेश कॉर्पोरेशन हद्दीत व कॅन्टोमेन्ट हद्दीत नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासारख्या प्राथमिक सोई वस्तीला उपलब्ध होत नाही. या विभागाचा समावेश कॉर्पोरेशन किंवा कॅन्टोमेन्ट हद्दीत करुन प्राथमिक सोई वस्तीला उपलब्ध होण्यासाठी झोपड पट्टीवासियांनी वारंवार मागणी केली असता श्री रत्नाप्पा कुंभार यांनी ही झोपट पट्टी दोन्ही संस्थाच्या हद्दीत नाही ही परिस्थिती लक्षात घेऊन ही झोपडपट्टी पुणे महानगर पालिकेच्या हद्दीत घ्यावी म्हणून पुणे महानगर पालिकेचे मन वळवण्याचा प्रयत्न शासनात्यावतीने करु व त्या दृष्टीने जी व्यवस्था करावयाला पाहिजे ती करण्याचे आश्वासन दिले.[३९]

कोल्हापूरचा पूर्वी मंजूर झालेला मास्टर प्लॅन रद्द झाल्याची तक्रार --

कोल्हापूरचा पूर्वी मंजूर झालेला मास्टर प्लॅन रद्द झाल्याची तक्रार सभागृहातील काही सदस्यानी केली अशावेळी नगरविकास मंत्री या नात्याने श्री रत्नाप्पा कुंभार यांनी याबद्दल समर्पक असा खुलासा केला तेव्हा झालेल्या प्रश्नोत्तराचा आढावा पुढील प्रमाणे ---

१. कोल्हापूरचा पूर्वी मंजूर झालेला मास्टर प्लॅन रद्द करण्यातआला आहे हे खरे आहे काय ?

२. असल्यास सुधारित मास्टर प्लॅन केव्हापासून अंमलात येण्याची शक्यता आहे

श्री रत्नाप्पा कुंभार यांनी त्यासंबंधी जे स्पष्टीकरण दिले ते पुढील प्रमाणे ---

१. कोल्हापूरचा पूर्वी मंजूर झालेला मास्टर प्लॅन रद्द करण्यात आला आहे.
२. कोल्हापूर महानगर पालिकेची सुधारित विकास योजना शासनाकडे मंजूरीसाठी पाठवली आहे, ती शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री रा. ना. मते -- या ठिकाणी कोल्हापूर महानगरपालिकेचा सुधारित विकास योजना शासनाकडे मंजुरीसाठी पाठवली आहे ती किती रुपयाची आहे व कधी पाठवली आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार ---

हा शहर रचनेचा मास्टर प्लॅन आहे या मध्ये पैशाचा प्रश्न नाही पण या प्लॅनचे शासनाकडून सर्व छाननी झाली आहे आणि काल सांगितल्या प्रमाणे यावर लौकरात लवकर निर्णय घेऊन मला सांगावयास हरकत नाही की ऑगस्ट अखेरपर्यन्त याबाबत निर्णय होईल.

श्री वि.हा. मेमजादे -- या ठिकाणी असा प्रश्न विचारला आहे की कोल्हापूरचा पूर्वीचा मास्टर प्लॅन रद्द करण्यात आला आहे हे खरे आहे काय असे विचारले असता नाही म्हणून उत्तर दिले आहे पण त्याच्यापुढे

म्हटले आहे की कोल्हापूर महानगरपालिकेने सुधारित विकास योजना शासनाकडे मंजुरीसाठी पाठविली आहे व ती शासनाच्या विचाराधिन आहे मग पूर्वीचा प्लॅन रद्द केला नाही हे कशाच्या आधारावर सांगितले ?

श्री रत्नाप्पा कुंभार - मास्टर प्लॅन कधीही रद्द होत नाही तर तो रिव्हाइज्ड होत असतो.

श्री रा.आ.खैरे -- अध्यक्ष महाराज मास्टर प्लॅन मध्ये फेरफार झाल्यामुळे कोल्हापूर चर्मोद्योग नगर आणि तेथील फॅक्टरी पाडणार होते पण हे चर्मोद्योग नगर फार मोठे असून तेथे मोठ्या प्रमाणावर कातडी कमावली जाते, आदर्श चर्मोद्योग नगर असून या ठिकाणी चमड्याचे टॅनिंग होतात, भारतात एवढ्या मोठ्याप्रमाणावर ते कोठेही होत नाही तेव्हा या वस्तीला आणि फॅक्टरीला काही त्रास होणार नाही अशी व्यवस्थाआपण करून देणार आहात काय ?

श्री रत्नाप्पा कुंभार -- या प्लॅनची छाननी होत आहे. त्यासाठी संबंधित लोकांबरोबर चर्चा केली जात आहे. आणि त्यानी सुचवल्या नंतर कमीत कमी लोकांना डिस्टर्ब केले जाणार आहे. या शहर वाढीसाठी पुष्कळ जमिन लागणार आहे त्याची मागणी अशी आहे की नगरपालिकेच्या हद्दीमध्ये जागा मिळावी आणि त्या दृष्टीने नगरपालिका हद्दीमध्ये जागा घ्यावयाची आपण ठरवलेली आहे.

डॉ.न.रा. पाठक -- अध्यक्ष महाराज, पहिला मास्टर प्लॅनची अजून छाननी होऊन राहिलेली आहे, त्यामध्ये कोणते दोष आढळले म्हणून हा सुधारित मास्टर प्लॅन करण्यात येत आहे.

श्री रत्नाप्पा कुंभार -- दहा - दहा वर्षांनी मास्टर प्लॅन रिव्हाइज होत असतात.

श्री अं.सी.कारखानीस -- पण सदरहू विकास योजनेचा रिव्हाईज डेव्हलपमेन्ट प्लॅन हा सरकारकडे मंजूरीसाठी पाठविला आहे आणि तो पाठवित असताना माजी प्रशासक देवस्थळी यानी जुन्या शहरातील अनेक

इमारती, घरे पाडली आणि त्यामध्ये सत्तेचा गैर वापर केला असे आपल्या वाटत नाही काय ?

श्री रत्नाप्पा कुंभार - हा मास्टर प्लॅन जो असतो तो ड्राफ्ट असतो आणि त्या ड्राफ्टला शासनाकडून मंजूरी मिळाली आहे.

श्री ना.रा. मते -- तेथे रहाणारे नोकरदार, दुकानदार आहेत त्याचे पुनर्वसन करीत असताना माणूसकीचा दृष्टिकोण ठेवून त्याच्या पुनर्वसनाची व्यवस्था शासन करील काय ?

श्री रत्नाप्पा कुंभार -- आतापर्यंन्त जेथे जेथे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे असे निदर्शनास आले आहे तेथे तेथे निरनिराळ्या प्रकारची पुनर्वसनाची व्यवस्था केली आहे. त्यादृष्टीने योजना झालेली आहे यातून जे कोणी राहिले असतील त्याचे पुनर्वसन दक्षतापूर्वक व काळजीपूर्वक व माणूसकीच्या दृष्टीने करता येईल.

श्री त्र्यं.सी.कारखानिस -- मास्टर प्लॅन हा शब्द शासनाच्या अर्बन डेव्हलपमेन्ट ने काढून टाकला आहे फक्त दोनच प्लॅन असतात एक टाऊन प्लॅन व दुसरा डेव्हलपमेन्ट प्लॅन असे दोनच शब्द आहेत. डेव्हलपमेन्ट प्लॅन हा शहराच्या बाहेर करावयाचा प्लॅन असतो व टाऊन प्लॅन हा शहरामध्ये राबवावयाचा असतो तेव्हा तुम्ही टाऊन प्लॅनिंग आणि डेव्हलपमेन्ट प्लॅनिंग यामध्ये फरक करणार नसाल तर यामध्ये बदल कसा होणार

श्री रत्नाप्पा कुंभार -- दोन्ही प्लॅन एकच आहेत.

श्री रा.अ.खैरे -- सध्या तेथे जे लोक राहातात त्यांना हलवणार नाही ना ? याचे कारण असे की तुमचा मास्टर प्लॅन होण्याच्या आत महानगरपालिकेने काही लोकांना नोटिसा दिल्या आहेत याची सरकारला कल्पना आहे काय ?

श्री रत्नाप्पा कुंभार - मी सांगितल्यानंतर पुढील ॲक्शन आपोआप होते .

श्री. त्र्यं.सी.कारखानीस - महाशरी मी जो उपप्रश्न विचारला होता त्याचं संपूर्ण उत्तर मला मिळाले नाही. माजी प्रशासक देवस्थळी यांनी इमारती व घरांची पाडापाड केली होती त्याला आपण मंजूरी दिली होती काय ?

श्री रत्नाप्पा कुंभार -- अध्यक्ष महाराज मी आता सांगितले की नगर रचनेचा प्लॅन न होता तो ड्राफ्ट प्लॅन चा प्रश्न होता. त्यावेळी जो प्लॅन असतो त्याला अंतीम मंजूरी मिळेपर्यन्त ड्राफ्ट प्लॅनला जी मंजूरी मिळालेली आहे ती लिगली आहे असे मी समजतो आणि त्याप्रमाणे प्रशासक तसे करतो.[४०]

कोल्हापूर शहर गटार योजना --

श्री त्र्यं.सी.कारखानीस ( कोल्हापूर ) यांनी नगर विकास मंत्र्यांना पुढील गोष्टींचा खुलासा विचारला ---

१) कोल्हापूर महानगरपालिका शहर गटार योजनेतील सद्य:स्थिती व प्रगती काय आहे ?

२) सदरहू योजना अंदाजे केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार यांनी केलेला खुलासा पुढील प्रमाणे --- आहे --

१ सदरहू योजनेतील स्थापत्यीक व यांत्रिकी कामे पूर्ण झालेली आहेत अ,ब,क,ड या भागातील भंगी ओढात जादा सांडपाणी नलिका टाकण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून यातील ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

२ उर्वरित कामे ऑक्टोबर १९७७ पर्यन्त पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.[४१]

कोल्हापूर शहराला होत असलेल्या पिण्याच्या गढूळ पाणी पुरवठ्याविषयी तक्रार --

कोल्हापूर शहराला अलिकडे होत असलेला गढूळ पाण्याचा पुरवठा तसेच पाणी पुरवठ्यातील अनिश्चितपणा त्यामुळे नागरिकांची होत असलेली कुचंबणा व या संदर्भात शासनाने केलेली योजना राबवली आहेत यासंबंधी श्री. त्र्यं. सी. कारखानीस यांनी नगरविकास मंत्र्याकडे खुलासा मागितला असता, श्री रत्नाप्पा कुंभार यांनी पुढीलप्रमाणे समर्थन केले ---

१) कोल्हापूर शहराची १९७१ च्या शिरगणतीनुसार लोकसंख्या २,५९,०५० आहे व सध्याची जवळपास ३,२५,००० आहे, शहराला बालिंगा व कळंबा अशा पाणीपुरवठा केन्द्रातून पाणी पुरविले जाते. बालिंगा केन्द्राची क्षमता दिवसाला ७.२ दशलक्ष गॅलन पुरवण्याची आहे. परंतु शहराची वाढती गरज लक्षात घेऊन या केन्द्रातून सध्या ९ दशलक्ष गॅलन पाणी पुरवावे लागते, त्यामुळे केन्द्रातील सर्व घटकावर त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त भार पडतो त्याचा परिणाम काही प्रमाणात शुध्दीकरणावर होतो. दिनांक १२ जून १९७७ रोजी पाऊस झाल्यामुळे नदीला नवीन पुराचे पाणी आले व त्याचा गढूळपणा एक लिटरमध्ये ८०० ते ९०० मिलीग्रॅम इतका वाढला. बालिंगा पाणीपुरवठा केन्द्रामध्ये व्हर्टिकल फ्लो स्लज ब्लँकेट या पध्दतीचे सेटलिंग टँकस आहेत तुरटी मिसळल्यानंतर पाणी या सेटलिंग टँक्समधून खालून वर येते. गाळ खाली राहातो. वरचे वरचे निव्वळ पाणी टफमध्ये घेऊन पुढे फिल्टरमधून गाळून घेतले जाते. पुराचे पाणी एकदम आल्यामुळे तुरटीचे प्रमाण वाढवूनही सेटलिंग टँकमधून निव्वळ पाणी मिळू शकले नाही. फिल्टरमधून हा गढूळपणा वाहून पुढे गेला व ते व्यवस्थित काम करेनासे झाले, अशा तऱ्हेच्या अडचणी साधारणत: पहिल्या पावसाच्या वेळेला येते. नेहमीपेक्षा जास्त गढूळपणा फिल्टरमधून पुढे शुध्द पाण्याच्या टाकीमध्ये जाऊन पुढे शहराला

मिळणाऱ्या जास्त पाण्यात गेला. त्यामुळे शहराला नेहमीपेक्षा जास्त गढूळ पाणी दिले गेले. पाण्याचा दर्जा सुधारताना तत्परतेने प्रयत्न करण्यात आले. पाणी केन्द्रातून कमी देऊन दर्जा सुधारण्याचा प्रयत्नही झाला. पण त्यात यश आले नाही. उलट पाणी शहराला कमी पडून तक्रारी वाढल्या, नंतर भोगावती नदीच्या धरणातून पाणी नदीत सोडून व पुराच्या पाण्याचे प्रमाण कमी करून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. याला मात्र यश येऊन तारीख १४ जून १९७७ पर्यन्त पाण्याचा दर्जा सुधारला. दिनांक १२ व १३ या कालामध्ये लोकांना थोड्या प्रमाणात गढूळ पाणी मिळत राहिले ही वस्तुस्थिती आहे. पण लोकांच्या आरोग्याला धोका होऊ नये म्हणून या कालामध्ये पाणी निर्जंतुक करण्यासाठी क्लोरिनचे प्रमाण अवश्यक तेव्हढे वाढविण्यात आले.

२) कोल्हापूर पाणी पुरवठा सुधार योजना ( टप्पा १ ) ही रु. २,६९,४४,००० ढोबळ किंमतीची असून या योजनेची कामे सध्या चालू आहेत. या योजनेकरिता पाणी बावडा येथे राजाराम बंधाऱ्याचे वरच्या बाजूस हेड टावर्समधून घेतले जाईल या योजनेची क्षमता ९.६ दशलक्ष गॅलन पुरवण्याची राहिल व ही योजना कार्यान्वित झाल्यानंतर पाण्यामध्ये चांगलीच वाढ होऊन कोल्हापूरच्या सर्व अडचणी निवारण होतील ही योजना कार्यान्वित होईपर्यन्त सध्याच्या पाणीपुरवठा केन्द्रातून त्याच्या क्षमतेपेक्षा सुद्धा जास्त पाणी नाईलाजास्तव सध्याप्रमाणे घ्यावे लागेल व तो पर्यन्त काही अंशी त्याचा पाण्याच्या दर्जावर परिणाम होणे अपरिहार्य आहे.

३) निवेदनामध्ये सांगितल्याप्रमाणे नदीला पुर आल्यामुळे गढूळ पाणी आले आहे आणि नेहमी पावसाळामध्ये पाणी असेच होते.

४) दुसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर हा प्रश्न येणार नाही आज आपण माणशी २५ गॅलन पाणी देऊ शकतो ते ४० गॅलन पाणी देण्याची व्यवस्था यामुळे होईल . काही भागात या योजनेला सुरुवात झाली आहे. आपण जर पंपिंग सेट वाढविले तर ,जेव्हा ५ लाख लोकवस्ती होईल तोपर्यन्त या योजनेतून पाणी उपलब्ध होईल या योजनेचा दुसरा टप्पा १९७८-७९ पर्यन्त

पूर्ण होईल आणि आपल्याला अधिक पाणी मिळेल. यावर पंपिंग सेट वाढविण्याचे काम योग्य वेळी होईल व लोकवस्ती ५ लाख झाली तरीही अडचण राहाणार नाही.

५) तुरटीचे प्रमाण कमी पडते असे नाही तर तिचा या गढूळ पाण्यावर काही परिणाम झाला नाही असे आहे.

६) पूर्वीची योजना तशीच राहाते आणि दुसरी योजना ॲडिशन होणार आहे.[४२]

प्रादेशिक व नगर रचना ( सुधारणा ) विधेयक --

सभागृहामध्ये वरील विधेयक मांडले असता श्री रत्नाप्पा कुंभारानी आपले मत प्रकट करताना सांगितले की, महाराष्ट्रात उद्योग धंद्याची वाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचा भार जी लहानमोठी शहरे आहेत त्यांच्यावर पडतो. त्यामुळे तेथील लोकांची इच्छा असो वा नसो हा लोकसंख्येचा भार पडतो. त्यामुळे तेथील लोकांवर त्याचा परिणाम होतो. भारतातील सर्व राज्यामध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या सर्वात जास्त म्हणजे ३२.३३ टक्के आहे. तेव्हा ही शहरे वाढताना जी शहरे वस्त्या निर्माण झाल्या त्यावेळी ही बिन नियोजनाने सर्व कामे झाली होती ही सर्व कामे नियोजनाने व्हावीत म्हणून महाराष्ट्राने १९६६ साली महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायदा १९६६ ला काढला. या कायद्याचे बारकाईने निरीक्षण करता असे दिसते की, आहेत ती शहरे कमीत कमी दुरुस्त व्हावीत आणि नवीन जी शहरे असतील त्याच्या लगत जोडून त्याची रचनाही विशेष शास्त्रीय पध्दतीने व्हावी आणि आज जसा प्रश्न निर्माण झाला आहे तसा होऊन नये म्हणून हा कायदा आणण्यात आला आहे. म्हणजे जुने काढून नवीन सुधारणा करताना जे निरनिराळे प्रश्न निर्माण होतात केवळ ते शहर रचनेमध्ये येतात असे नाही तर निरनिराळ्या विकासाची कामे आहेत तेथेही पुर्नवसनाचे प्रश्न निर्माण होतात. अशाप्रकारे या विकासाच्या प्रगतीशील युगामध्ये एका बाजूला

विकास होत राहातो आणि त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात. तरीही या विकासाने अनेक लोकांना फायदा होणार आहे. अनेक लोकांवर त्याचा परिणाम होणार आहे तेव्हा या दोन्हींचाही कुठेतरी मेळ घातला पाहिजे.

ज्या शहरामध्ये शॉपिंग सेंटर आहे त्या शहरामध्ये स्वत:ला राहाण्यासाठी घर बांधून घ्यावयाचे असेल तर त्याला तशी जागा द्यावी किंवा भाड्याने राहाणार असेल तर अशा प्रकारची जागा उपलब्ध करून द्यावी तसेच निरनिराळ्या ठिकाणी अनेक बेघर झालेले लोक असतील किंवा ज्यांची दुकाने गेली असतील अशा लोकांचे पुनर्वसन करीत असताना ज्या ठिकाणांनी बेघरांचे पुनर्वसन केले जाईल त्या ठिकाणी दुकानांची लाईन होऊ शकत असेल तर त्या ठिकाणी दुकानदारांची व्यवस्था करता येईल म्हणजेच जेव्हा निरनिराळ्या शहराची पुनर्रचना करताना तेथे शॉपींग सेंटर साठी जागा राखून ठेवून करावी व त्या ठिकाणी ते स्वत: घर बांधत असतील तर जागा द्यावी व ज्यांना घर बांधणे अशक्य असेल त्याना भाड्याने जागा देण्याची व्यवस्था करावी.[४३]

<u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक --</u>

श्री रत्नाप्पा कुंभारानी सभागृहामध्ये वरील महानगरपालिका अधिनियमासंबंधी काही सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडले त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे --

श्री रत्नाप्पा कुंभार ( नगरविकास मंत्री ) महोदय, मी आपल्या अनुमतीने सन १९७७ चे वि.स.वि.क्रमांक ३२ ( मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक ) विचारात घ्यावे असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील महानगर पालिकांचा कारभार हा योग्य रीतीने चालावा म्हणून हे दुरुस्ती विधेयक या ठिकाणी आणण्यात आले आहे. मुंबई महानगर पालिका अधिनियम मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगर पालिका अधिनियम १९४८ अन्वये कारभार करित असताना शासनाला काही अडचणी दिसून आल्या. या तिन्ही अधिनियमांमध्ये नोकरांच्या नियुक्ती संबंधी काही विशेष प्रकारची योजना आहे. नोकरांच्या नियुक्ती संबंधी जी बंधने आहेत ती महाराष्ट्र प्रांतिक महानगर पालिका अधिनियमात नाही तेव्हा या बाबतीत काटेकोरपणे अंमलबजावणी करावयाची झाली तर या गोष्टींचा विचार केला पाहिजे. नातेवाईकांच्या नोकरी संबंधाने काही बंधने आली पाहिजेत या गोष्टींचा विचार करता बापासून छालपर्यन्त नवरा,बायको, नोकरीमध्ये एकाच ठिकाणी राहू शकत नाहीत पण ही गोष्ट अंमलात आणणे फार कठिण काम आहे. तेव्हा दोन अधिनियमात अशा प्रकारची तरतूद आहे ती शासनाने काढून घेण्याबाबत विचार केला आहे व त्या संदर्भात त्या तिन्ही अधिनियमात दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक येथे मांडले आहे. मुंबईमनगर पालिकेच्या कलम ६०(क) व कलम ८६ मध्ये ही दुरुस्ती करावी लागणार आहे. मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४२ मध्ये व प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचा कलम ५९ मध्ये अशा प्रकारची दुरुस्ती करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे नागपूर महानगरपालिका अधिनियमातसुध्दा दुरुस्ती करावी लागणार आहे.

अध्यक्ष महाराज, दुसरी गोष्ट म्हणजे महानगरपालिकांना निरनिराळ्या समारंभासाठी खर्च करावा लागतो. अशा प्रकारच्या खर्चासाठी राज्यशासनाची परवानगी घ्यावी लागते पण प्रत्येक वेळी अशाप्रकारची परवानगी घेणे महानगरपालिकांना शक्य होत नाही. तेव्हा महानगरपालिका

ही स्वतंत्र संस्था आहे ही गोष्टी लक्षात घेता प्रत्येक लहान लहान गोष्टींना परवानगी घेणे संयुक्तिक होणार नाही. याचा शासनाने विचार केला व त्या दृष्टीने तिन्ही अधिनियमात दुरुस्ती करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे अशी योजना करण्यात आली की मुंबई महानगर पालिकेच्या बाबतीत जर त्यानी वार्षिक खर्च हा १ लाख रुपया पर्यन्त केला तर त्यास शासनाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही मात्र हा खर्च १ लाखापेक्षा अधिक असेल तर त्याना शासनाकडे यावे लागेल. तसेच इतर ज्या महानगर पालिका आहेत त्यानी जर वार्षिक खर्च २५ हजार पर्यन्त केला तर त्यासाठी परवानगीसाठी शासनाकडे येण्याची आवश्यकता नाही पण जर जास्त खर्च केला तर त्यासाठी त्याना शासनाकडे यावे लागणार. यामध्ये अशाप्रकारची मर्यादा घातल्यानंतर अनुभवाने जर शासनाला वाटले की मर्यादेमध्ये वाढ करण्याची गरज आहे तर तसे अधिकार शासनाला देण्याची तरतूद यात केली आहे.

अध्यक्ष महाराज तिसरा मुद्दा असा की महानगरपालिकांना आपली कर्तव्य पार पाडीत असताना कत्तलखाने काढणे, शहरामध्ये जो केर-कचरा तयार होतो त्याचा उपयोग करण्याच्या दृष्टीने कंपोस्ट खत तयार करणे, सुवेजची सोय करताना जे पाणी वाया जाणार आहे त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करणे अशाप्रकारच्या निरनिराळ्या योजना कराव्या लागतात. या योजना त्याना महानगरपालिकेच्या खर्चातून करणे शक्य होत नाही. तेव्हा अशाप्रकारच्या योजना राबवत असताना जे उद्योग चालवावयाचे असतात ते चालवित असताना त्यात महानगरपालिकेने भागीमध्ये काम करावे म्हणून भाग भांडवल हे त्यामध्ये गुंतवण्यासाठी महानगरपालिकांना मुभा असावी अशा त-हेची दुरुस्ती सुचवली आहे अशा प्रकारची तरतूद मुंबई महानगर पालिकेच्या अधिनियमात होती पण नागपूर महानगर पालिकेच्या अधिनियमात नव्हती. म्हणून तशा प्रकारची दुरुस्ती नागपूर महानगरपालिका अधिनियमात १९४८ या मधील खंड १० मध्ये सुचवलेली आहे. तेव्हा या पेक्षा अधिक खुलासा करावा अशी मला गरज वाटत नाही. ही अतिशय आवश्यक अशी दुरुस्ती आहे. काम करताना ज्या अडचणी निर्माण झाल्या आहेत त्या लक्षात

घेऊनन ही दुरूस्ती करण्यात आली आहे. ती मंजूर करावी अशी अपेक्षा आहे. या पेक्षा जास्त सांगण्याची सुरूवातीला गरज नाही. म्हणून हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.[४४]

कोराडी विद्युत प्रकल्पामुळे होणारे जल प्रदुषण थांबवण्याची उपाय योजना --

दिनांक २९-७-१९७७ रोजी नगर विकास मंत्री श्री रत्नाप्पा कुंभार यांना उद्देश्यून पुढील प्रश्न सभागृहात विचारले व त्याला समर्पक उत्तरे त्यानी दिली त्याचा वृत्तांत पुढील प्रमाणे ---

(१) कोराडी विद्युत प्रकल्पातील इलेक्ट्रोस्टाटिक प्रोसिपिटेटस मध्ये जमा होणारी राख ज्या पाण्यात मिसळून ज्या टाक्यात नेली जाते त्या टाक्याचे बांधकाम पूर्ण झाले काय ?

(२) नसल्यास हे काम पूर्ण करण्याचे दृष्टीने काय कारवाई करण्यात आलेली आहे .

श्री रत्नाप्पा कुंभार --

१ टाक्याचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही.

२ राखेच्या बांधा-याची मजबुतीची योजना तयार करण्यासाठी एक सल्लागार मंडळ नेमले आहे. सल्लागाराकडून ही योजना आल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात होईल. कायम स्वरूपाचा बंधारा होईपर्यन्त महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने राख साठवण्यासाठी लहान दुय्यम स्वरूपाचा बांधारा करावयाचा ठरवला आहे. या बंधा-यावरून व्हाणारे राख विरहित पाणी फक्त कोलार नदीत सोडले जाईल. पर्यायाने राख विरहित पाणी विद्युत केन्द्रात वापरले जाईल. या प्रकारच्या दुय्यम बंधा-याचे काम फेब्रुवारी १९७८ अखेर पूर्ण होईल.[४५]

नागरी क्षेत्रातील प्राथमिक शाळा नगरपालिकेच्या ताब्यात देण्याविषयीचा निर्णयाबाबत श्री रत्नाप्पा कुंभारांना पुढील प्रश्न विचारले असता त्यानी त्याचा केलेला खुलासा पुढीलप्रमाणे ---

१) नागरी क्षेत्रात प्राथमिक शाळा जिल्हापरिषदेकडून चालवली जाते. तेथील नगरपालिकेने मागणी केल्यास त्यांचेकडे प्राथमिक शिक्षणाचा भार सोपवावा असा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय ?

२) असल्यास त्याची कारणे काय ?

३) सदरहू योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार --

१ होय

२ आपल्या क्षेत्रात प्राथमिक शिक्षण चालवणे ही जबाबदारी नगरपरिषदांची आहे, तशी मागणी नगरपालिकांनी वारंवार केली आहे.

३ (अ) नगरपरिषदांच्या वर्गवारीप्रमाणे त्यांना त्यांच्या क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाचा ताबा दिल्यानंतर प्राथमिक शिक्षणावरील मान्य खर्चावरील खालील दराने अनुमोदन देणे --

| नगरपालिकाचा वर्ग | अनुदानाचा दर (टक्के ) |
|---|---|
| १) अ वर्ग | ८० टक्के |
| २) ब वर्ग | ९० ,, |
| ३) क वर्ग | १० ,, |

(ब) म्युनिसिपल स्कुल बोर्ड स्थापण्याविषयीच्या तरतुदी वगळून त्याऐवजी प्राथमिक शिक्षणाचा कारभार चालवण्यासाठी नगरपरिषदांमध्ये शिक्षण समित्या स्थापन करण्याविषयीची तरतूद संबंधित अधिनियमात करणे.

(क) ज्या नगर परिषदामध्ये प्राथमिक शिक्षणाचे काम जास्त आहे त्यानी प्राथमिक शिक्षणाचे काम योग्य प्रकारे व्हावे याकरिता एक स्वतंत्र प्रशासन अधिकारी नियुक्त करण्याविषयीची तरतूद संबंधित अधिनियमात करणे.

(ड) प्राथमिक शाळेच्या इमारती बांधण्यासाठी ज्या तत्वावर जिल्हापरिषदांना अनुदान दिले जाते याच तत्वावर नगरपरिषदांनाही अनुदान देणे.[४६]

वाई नगरपरिषदेच्या गैरकारभारासंबंधी निवेदन --

वाई नगरपालिकेच्या गैर कारभारासंबंधी नगरपालिकेच्या सदस्यांनी एक निवेदन जानेवारी १९७७ मध्ये जिल्हाधिकारी सातारा व मे १९७७ मध्ये डायरेक्टर ऑफ म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशन यांना दिले असता यातील मुद्दे व शासनाने तत्संबंधी केलेली कारवाई नगरविकास मंत्री श्री रत्नाप्पा कुंभार यांनी पुढीलप्रमाणे सांगितली आहे ---

निवेदनातील प्रमुख मुद्दे --

१) कोणतेही कारण नसताना रु. १,३९,८७० एवढी मोठी रक्कम मुख्याधिकारी, सॅनिटरी इन्स्पेक्टर, पेट्रोल, डिलर्स व कॉन्ट्रॅक्टर यांचे नावे ॲडव्हान्स शिल्लक आहेत ती ताबडतोब वसूल करावी.

२) वर्षाअखेरीस ऑडिट अकौन्टस नगरपालिकेपुढे ठेवले जात नाहीत व अकौन्टस सर्वांना पाहाण्यासाठी ठेवले जात नाही.

३) प्लॅन, इस्टीमेन्ट, टेंडर मंजुरी वगैरे अत्यावश्यक बाबींची पूर्तता न करता निरनिराळ्या अवास्तव कारणासाठी मोठ्या रकमा खर्ची टाकलेल्या आहेत.

४) बजेटमध्ये तरतूद नसतानाही निरनिराळ्या कारणासाठी रकमा खर्ची टाकल्या आहेत.

वाई नगरपालिकेच्या गैरकारभाराविषयी प्रथम दर्शनी पुरावा आढळल्याने मुख्याधिकारी श्री. खटावकर यांना शासनाने दिनांक २८ ऑगस्ट १९७७ रोजी निलंबित केले असून नगरपालिकेनेही मुख्य लिपिक श्री. सूर्यवंशी यांना निलंबित केले आहे.[४७]

मुरगुड ( जिल्हा कोल्हापूर ) नगरपरिषदेचे अध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या विरुध्द तक्रारीचे निवेदन --

मुरगुड नगरपरिषदेचे अध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीचा खुलासा मा. श्री. रत्नाप्पा कुंभार यांनी पुढील प्रमाणे केला --

१) निवेदनातील तक्रारीचे थोडक्यात स्वरुप सोबत जोडलेल्या विवरण पत्रात दिल्याप्रमाणे आहे.

२) या निवेदनावर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून अहवाल मागविला आहे व तो प्राप्त झाल्यावर त्याची छाननी करुन योग्य ती कारवाई केली जाईल.

विवरण --

१) नगरपालिकेत पिण्याच्या पाण्याची सोय, आरोग्य विषयक सोई, नगर विकास योजना, रस्ते, गटारी व जनावराना दवाखाना याबाबत कोणत्याही नवीन योजना अंमलात आणल्या नाहीत.

२) नगरपालिकेचे खरेदीचे सर्व व्यवहार हे संशयास्पद असून ते अगदी गुप्त ठेवण्यात येतात.

३) नगरपालिका, सदस्याना व कर्मचाऱ्याना मानहानिकारक वागणूक देण्यात येते.

४) लेखा परीक्षाअहवाल गेल्या २० वर्षापासून गंभीर आक्षेप घेतले असून त्याची पूर्तता केलेली नाही.

५) अध्यक्ष, हे नगरपालिका कार्यालयात न येता स्वत:च्या बंगल्यावरून कारभार चालवितात.

६) अध्यक्ष, त्याना अधिकार नसताना चुकीच्या पध्दतीने विना चौकशी नोकरांना कमी करतात, बडतर्फ करतात.

७) अध्यक्षाच्या मर्जीनुसार बांधकामे चालतात तसेच नगरपालिकेच्या मालकिच्या जागा इच्छेनुसार काढून टाकल्या.

८) नगरपालिकेचे डेड स्टॉक रजिस्टर मागणी करूनही सभासदाना पाहाण्यास मिळत नाही.[४८]

चंद्रपूर व बल्लारपूर येथील कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणासंबंधी तक्रारी ---

श्रीमती यशोधरा बजाज यांनी नगर विकास मंत्री श्री रत्नाप्पा कुंभार यांना वरील प्रश्ना संदर्भात विचारलेले प्रश्न व त्याला मंत्र्यानी दिलेली समर्पक उत्तराचा आढावा पुढीलप्रमाणे --

१) चंद्रपूर व बल्लारपूर येथील कारखान्यातून होणाऱ्या हवा प्रदूषण व जल प्रदूषणासंबंधी तक्रारी लोकाकडून, शासनाकडून आल्या आहेत हे खरे आहे ?

२) असल्यास, शासनाने त्यावर काय कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार ---

१) होय, हे खरे आहे. चंद्रपूर येथील कारखान्यातून होणाऱ्या हवा प्रदूषणासंबंधी तक्रारी आल्या असून बल्लार येथील कारखान्या विरुध्द जलप्रदूषणासंबंधी तक्रारी आल्या आहेत.

२) चंद्रपूर येथील हवा प्रदूषणाविषयीची तक्रार ही मेसर्स सोलार केमिकल्स संबंधी आहे. सल्फुरीक ॲसिड निर्मिती प्लॅंटमधून होणाऱ्या धुरांचे नियंत्रण करण्यासाठी कारखान्याला कालमर्यादा कार्यक्रम आखून दिला आहे. टप्प्याटप्प्याने हा कार्यक्रम २८ फेब्रुवारी १९७८ पर्यन्त पूर्ण करावयाचा आहे. बल्लारपूर येथील जलप्रदूषणाविषयी आलेल्या तक्रारीशी मेसर्स बल्लारपूर इंडस्ट्रिज यांचा संबंध येतो. आणि या औद्योगिक कारखान्याला सांडपाण्यावरती प्रक्रिया करण्याबाबतची सोय करण्यासाठी काही कालमर्यादा घालून दिलेली आहे आणि या कार्यक्रमानुसार ही प्रक्रिया योजना ( ट्रेटमेन्ट ) ऑपन प्लॅन्ट १ मार्च १९७८ पर्यन्त चालू करावयाची आहे व त्यानुसार कागद कारखान्याचे चालक याबाबत कारवाई करीत आहेत. परंतु यासाठी जमीन उपलब्ध नसल्यामुळे हा कार्यक्रम अडून राहिला आहे. जमिन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.[४९]

<u>मनमाड नगरपालिकेच्या गैरकारभाराबाबत चौकशी --</u>

वरील प्रश्नासंदर्भात नगरविकास मंत्री यांनी पुढील गोष्टींचा खुलासा केला ---

१) मनमाड नगरपालिकेतील गैरव्यवहाराच्या चौकशी अहवालाची छाननी पूर्ण झाली आहे काय ?

२) असल्यास, त्याचा निष्कर्ष काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार -- १) व २) मनमाड नगरपालिकेकडून कर्तव्ये पार पाडण्यात कुचराई झाली आहे असे निदर्शनास आल्याने, नगरपालिकेसाठी प्रशासक कां नेमू नये त्याची कारणे दाखवा अशी नोटीस दिनांक ३१ ऑगस्ट १९७७ रोजी मनमाड नगरपालिकेस देण्यात आली आहे.[५०]

<u>पुणे शहरातील मोडकळीला आलेली घरे --</u>

सभागृहात दि. २० ऑक्टोबर १९७७ रोजी पुणे शहरातील मोडकळीला आलेल्या घरासंबंधी काही प्रश्न नगरविकास मंत्री यांना विचारले असता त्याचा खुलासा मंत्री या नात्याने श्री रत्नाप्पा कुंभार यांनी केला तो पुढीलप्रमाणे ---

१) पुणे शहरामध्ये मोडकळीस आलेली एकंदर किती घरे आहेत त्यापैकी किती घराना नोटीस देण्यात आलेल्या आहेत,

२) माहे ऑगस्ट १९७७ मध्ये यापैकी किती घरे कोसळली व त्यामुळे किती लोक दगावले ?

श्री रत्नाप्पा कुंभारांनी वरील प्रश्नाची उत्तरे पुढील प्रमाणे दिली ---

१) अशा प्रकारे निश्चित माहिती देणे कठिण आहे असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे, तथापि १ एप्रिल १९७६ ते २३ सप्टेंबर १९७७ या मुदतीत ज्या घराचे भाग अथवा घरे धोक्याची झाली आहेत अशा ९६८ इमारती निदर्शनास आल्या त्या सर्वांस दुरुस्ती करण्यासाठी अगर धोक्याचा भाग उतरविण्यासाठी पुणे नगरपालिकेने नोटिसा दिलेल्या आहेत.

२) माहे ऑगस्ट १९७७ मध्ये दिनांक २५ ऑगस्ट १९७७ रोजी बुधवार पेठेतील ६४२ । ४३ या घराचा उत्तर-पश्चिम भाग अचानक कोसळला व पडलेल्या भागाखाली २ मुलें दगावली.[५१]

<u>नांदूर नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना --</u>

अ.अ.वानखेडे (मलकापूर ), श्री.द.नातु ( गुहागर ) यांनी नगरविकास मंत्री श्री रत्नाप्पा कुंभार यांना नांदूर नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना संदर्भात काही प्रश्न विचारले व त्याला मंत्र्यानी समर्पक उत्तरे दिली त्याचा आढावा पुढील प्रमाणे ---

१) नांदुर नगरपरिषदेच्या ( जिल्हा बुलढाणा ) पाणीपुरवठा योजनेस शासनाने मंजूरी दिली आहे हे खरे आहे काय, असल्यास केव्हा ?

२) योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यासाठी अंदाजित खर्च किती आहे ;

३) या योजनेला येणाऱ्या खर्चा पैकी किती रक्कम शासनाकडून अनुदान व कर्जाचे रुपाने मिळणार आहे व प्रत्यक्ष किती दिली आहे ;

४) सदर योजना केव्हा पूर्ण होण्याची शक्यता आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभारांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले ---

१ वरील योजनेस प्रशासकीय मान्यता शासन निर्णय ( नगरविकास व आरोग्य विभाग ) क्र.डब्ल्यूएसएम । ६७७६-२९७६। युडी-२१ (३२२ एस), दिनांक २ जून १९७७ अन्वये देण्यात आली.

२ बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा सिंचन योजनेच्या तांदुळवाडी धिारच्या पाणी साठयातून पाणी घेवून ते शुध्द व निर्जंतुक करुन नांदूर गावास पुरवण्याची योजना आहे.

योजनेचा अंदाजित खर्च रु.५२,९८,१०० लाँबळ इतका आहे.

३ या योजनेची वित्तिय व्यवस्था खालीलप्रमाणे ---

अ) १० टक्के लोक वर्गणी रु.५,२९,८१०.

ब) ५० टक्के शासकीय अनुदान रु.२६,४९,०५०.

क) ४० टक्के कर्ज रु.२१,१९,२४०.

आयुर्विमा महामंडळाकडून अद्याप कर्ज मंजूर झाले नाही. त्याचप्रमाणे अनुदानाचेही रक्कम देण्यात आलेली नाही.

४ आयुर्विमा महामंडळाकडून कर्ज मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. कर्जाची रक्कम मिळाल्यानंतर व जिल्हा नियोजन मंडळाकडून

अनुदानाचा निधि योग्य प्रमाणात उपलब्ध झाला तर २ वर्षांच्या कालावधित योजना पूर्ण करणे शक्य होईल.[५२]

इचलकरंजी सभोवतीची काही गावे नगरपालिकेच्या हद्दित समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव --

इचलकरंजी सभोवतीची काही गावे नगरपालिकेच्या हद्दित समाविष्ट करण्याबाबत जनतेच्या प्रतिक्रिया व शासनाचा निर्णय काय आहे याबद्दल सभागृहात झालेली चर्चा पुढीलप्रमाणे ---

१) इचलकरंजी शहारासभोवतीची काही गावे सदर नगरपालिकेच्या हद्दित सामील करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय ?

२) असल्यास, सदर गावे कोणती आहेत,

३) उक्त गावे नगरपालिकेच्या हद्दित समाविष्ट करण्याची कारणे काय आहेत,

४) या बाबत जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या काय ? असल्यास त्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय होते ?

श्री रत्नाप्पा कुंभार ---

१. होय

२.(१) मौजे कबनुर गावठाण व मौजे कबणुर गावामध्ये समाविष्ट असलेले सर्व गट नंबर्स

२) मौजे कोरोची गावठाण व मौजे कोरोची गावामध्ये समाविष्ट असलेले सर्व गट नंबर्स

३) मौजे शहापूर गावठाण व मौजे शहापूर गावामध्ये समाविष्ट असलेले सर्व रिव्हिजन सर्व्हे नंबर्स

४) मौजे तारदाळ गावापैकी ४२ रिव्हिजन सर्व्हे नंबर्स.

५) मौजे यड्राव गावठाण व मौजे यड्राव गावामध्ये समाविष्ट असलेले सर्व रिव्हिजन सर्व्हे नंबर्स.

३. इचलकरंजी शहराची औद्योगिकदृष्ट्या वाढ झपाट्याने होते असून कामगारांची संख्या वाढत आहे. त्यामुळे झोपडपट्टी वाढणेची भिती निर्माण झालेली आहे. शहराच्या हद्दीबाहेर होत असलेली वसाहत योजनाबध्द नाही म्हणून या शहराचा येत्या २० वर्षात योजनाबध्द विस्तार होण्याच्या दृष्टीने कोल्हापूर इचलकरंजी प्रादेशिक नियोजन मंडळाने इचलकरंजी शहराचे सुव्यवस्थितीत वाढीसाठी एक योजना केली व त्यानुसार नगरपालिकेने हा प्रस्ताव शासनाकडे पाठविला.

४. होय. हरकतीचे सर्वसाधारण स्वरुप खालीलप्रमाणे आहे ---

अ. नगरपालिकेच्या विविध करांचा बोजा पेलणार नाही.

ब. जिराईत जमिनीचा केलेला विकास फुकट जाईल.

क. प्रस्थापित उद्योग धंद्याचे विकासात खिळ बसेल.

ड. शासकीय धोरणानुसार ग्रामीण भागांना मिळणाऱ्या सवलती रद्द होतील.

इ. गावाचे अस्तित्व व इतिहास नष्ट होईल. तसेच खेड्यात राहाणाऱ्या कामगारांस आरोग्य विषायक प्रश्न तसेच महागाई यांना तोंड द्यावे लागेल.

ग. इचलकरंजीच्या सध्याच्या गैरसोईत भर पडेल.[५३]

<u>नागपूर येथील यशवंत स्टेडियमचे बांधकामाबाबत सर विश्वेश्वरैया रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा अहवाल</u> --

सभागृहात वरील प्रश्नासंदर्भात काही प्रश्न नगरविकास मंत्री श्री रत्नाप्पा कुंभार यांना विचारला असता त्याचा खुलासा त्यानी पुढीलप्रमाणे केला ---

१) नागपूर येथील यशवंत स्टेडियम संबंधी सर विश्वश्वरैया रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूर यांनी दिनांक २४ जून १९७७ रोजी महानगरपालिकेस सादर केलेल्या अहावालाची छाननी पूर्ण झाली आहे काय ?

२) असल्यास या प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला ?

रत्नाप्पा कुंभार ---

१ होय

२ या अहवालाप्रमाणे स्टेडियमच्या डिझाईनमध्ये कोणताही दोष नसल्याचे इंजिनिअरिंग कॉलेजच्या तंत्रज्ञांनी मत दिलेले आहे. आता भूतपूर्व अतिरिक्त चिफ इंजिनियर श्री. मिराणी यांच्या सल्यानुसार पुढील बांधकामाच्या कार्यक्रमाची आखणी करण्यात येत आहे. ही सर्व कार्यवाही याबाबतीत सक्षम असलेल्या महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.[५४]

<u>मुंबईतील चिंचपोकळी पुलाजवळ एका इमारती भोवतालची भिंत कोसळून झालेला अपघात --</u>

वरील प्रश्नासंबंधी श्री रत्नाप्पा कुंभार यांनी पुढील प्रमाणे खुलासा केला --

१ ५१८-५२८ ना.म.जोशी मार्गावरील इमारतीच्या आवाराची विटेची भिंत जवळच्या दोन झोपड्यांवर कोसळली, या अपघातात मातीच्या ढिगा-याखाली एकूण १४ माणसे गाडली गेली. त्यातील ४ माणसे मृत्यू पावली व १० माणसे जखमी झाली.

सदर भिंत अतिशय जुनी होती व भिंतीच्या पायात मुसळधार पावसाच्या पुरामुळे पाणी साचून राहिल्यामुळे भिंत कमकुवत झाली व परिणामी कोसळली.

३) मुख्यमंत्री निधीतून मदत देण्याचा प्रश्नावर विचार चालू आहे.[५५]

कोल्हापूर महानगरपालिकेचे १९७२-७३ व १९७६-७७ या कालावधीतील घरपट्टी कराचे उत्पन्न व सापनसफाई ---

कोल्हापूर महानगरपालिकेचे उत्पन्नाबाबतचा तपशिल नगरविकास मंत्री श्री रत्नाप्पा कुंभार यांनी पुढीलप्रमाणे दिला ---

| | सन १९७२-७३ उत्पन्न रुपये | सन १९७६-७७ उत्पन्न रुपये |
|---|---|---|
| १) सामान्य कर | २९,५९,३०५ | ४७,३२,७३४ |
| २) सापनसफाई कर | ९४,५९९ | ११,०१,१०२ |
| एकूण | ३०,५३,९०४ | ५८,३३,८३६ |

३) अंदाजे रुपये ६८,२०,००० इतके.

४) गतपूर्व कोल्हापूर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर दिनांक १५ डिसेंबर १९७२ पासून करण्यात आले असून या दिनांकापासून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ हा त्या महानगरपालिकेस लागू करण्यात आला आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार प्रॉपर्टी कराचे दर प्रत्येक वर्षी थोड्या प्रमाणात वाढविण्यात आले आहेत. सर्व मिळतीचे चतुर्थ वार्षिक फेर रिव्हिजन करण्यात आलेमुळे तसेच नवीन बांधलेल्या इमारती व इमारतीमध्ये केलेले फेरफार यामुळे वार्षिक करपात्र मुल्यात व त्यान्वये कराचे उत्पन्नात वाढ झालेली आहे.[५६]

नगरपालिका अर्थ आयोगाच्या अहवालातील शिफारशीबाबत निर्णय --

श्री पा.आ.देशमुख (परंडा ) यांनी नगरपालिका अर्थ आयोगाच्या अहवालातील शिफारशीबाबत काही प्रश्न विचारले असता त्याचा खुलासा नगरविकास मंत्री श्री.रत्नाप्पा कुंभार यांनी केला त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे --

१) नगरपालिका अर्थ आयोगाच्या अहवालातील शिफारस क्रमांक ९, १३, १६, १७, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३५, ३९, ४० व ४६ बाबतीत शासनाचा विचारपूर्ण झाला आहे काय ?

२) असल्यास, त्याबाबत काय निर्णय घेण्यात आला आहे,

३) शिफारस क्रमांक ४ नुसार नगरपरिषदांना दवाखाने, शाळा व क्रिडांगणे अशासारख्या कामासाठी निधी उभारता यावा यासाठी जरूर ते विधि विधान करण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे ?

श्री रत्नाप्पा कुंभार (१) व (२) शिफारस क्रमांक ९, १३, १६, १७, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३९ व ४७ शासनाचे विचाराधीन आहेत.

शिफारस क्रमांक ३५ -- नगरपरिषदांना विकास आराखड्यातील कामाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा नियोजन मंडळानी केलेल्या जिल्ह्याचे वार्षिक योजनातील तरतुदीनुसार सहाय्य दिले जाते.

शिफारस क्रमांक ४० -- महाबळेश्वराची पाणी पुरवठा योजना शासनाने ताब्यात घेतली असून शासन ग्राहकांकडून पाणी पट्टी वसूल करते त्यामुळे महाबळेश्वर नगरपरिषदेस एकस्तीचा दर आकारण्याचा प्रश्न शिल्लक राहात नाही.

४) निधी उभारण्यासंबंधिच्या सूचना नगरपरिषदांना देण्यात आल्या आहेत. यासाठी विधि विधानाची आवश्यकता शासनास वाटत नाही.[५७]

अशा रीतीने मा.रत्नाप्पा कुंभार यांचेकडे महाराष्ट्र शासनाने गृह माहिती व प्रसिध्दी खात्याचे राज्यमंत्री म्हणून फार मोठी जबाबदारी सोपवली व त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि नगरविकास खात्याचे मंत्री असे दोन वेळा कॅबिनेट मंत्र्याची जबाबदारी टाकली. ही जबाबदारी त्यानी अत्यंत कुशलतेने यशस्वी करून दाखवली व आपल्या कार्याचा ठसा उठविला.तसेच मंत्री म्हणून सर्वसामान्य गोरगरिब,दुबळ्या लोकांसाठी कार्य केले.

पुढे १९७८ च्या सार्वजनिक निवडणूकीत शिरोळ मतदारसंघातून ते पुन्हा निवडून आले.[५८] मात्र महाराष्ट्र विधान सभेच्या १९८० च्या निवडणूकीमध्ये शिरोळ मतदार संघात अटीतटीच्या चौरंगी लढतीत श्री रत्नाप्पा कुंभार हे दिनकरराव यादव यांचेकडून पराभूत झाले.[५९]

आण्णांचे राजकीय जीवनही विलोभनीय आहे. खासदार, आमदार थोड्या विलंबाने मंत्रीपदाचा सन्मान त्याना लाभला पण या पदामुळे किंवा विजयाने ते हुरळून गेले नाहीत किंवा १९८० च्या विधान सभा निवडणूकीतील पराभवाने खचूनही गेले नाहीत.

राजकीय जीवनात उलाढाली नेहमीच होत राहातात. सत्ता स्पर्धेत कोणी जिंकतात, कोणी हरतात. आण्णांच्या वाट्याला हे चढ - उतार नेहमीच आलेले आहेत. पण समाज सेवेची,जनसेवेची त्यांनी कधीही टाळाटाळ केली नाही हे त्यांचे वैशिष्ट्य आहे म्हणूनच शिरोळ तालुक्यातील सुबुध्द जनतेच्या अंत:करणात ' आण्णा ' म्हणजे ताईत बनले असल्यामुळे १९९० च्या विधान सभेच्या निवडणूकीत त्यानी प्रचंड विजय संपादन करून लोकप्रियतेची पावती पुन्हा एकदा मिळवली आहे.[६०]

## संदर्भ ---


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दै.पुढारी - कोल्हापूर - १८ फेब्रुवारी १९६२ | | | | | |
| २ | दै. पुढारी - कोल्हापूर - १८ फेब्रुवारी १९६२ | | | | | |
| ३ | क्रांतिवीर दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार - अमृतमहोत्सव - गौरव गाथा | | | | | |
| ४ | दै.पुढारी - कोल्हापूर - २८ फेब्रुवारी १९६२ | | | | | |
| ५ | दै.पुढारी - कोल्हापूर २३ फेब्रुवारी १९६७ | | | | | |
| ६ | दै.पुढारी - कोल्हापूर १२ मार्च १९७२ | | | | | |
| ७ | डिबेट महाराष्ट्र विधानसभा व्हॉल्यूम - | ४२१ | २८ नोव्हेंबर,१९७४ | | | |
| ८ | --,,-- | ४२.१ | | ,, | १९७४ | |
| ९ | --,,-- | ४२.१ | | ,, | १९७४ | |
| १० | --,,-- | ४२.१ | १९ नोव्हेंबर | १९७४,पा.नं. | | १३२ |
| ११ | --,,-- | ४१.१ | १९ | ,, | ,, | १३५ |
| १२ | --,,-- | | १९ | ,, | ,, | १३७-१३८ |
| १३ | --,,-- | | १९ | ,, | ,, | १४० |
| १४ | --,,-- व्हॉल्यूम | ४२.१ | १९ | ,, | ,, | १४२ |
| १५ | --,,-- | ४२.१ | | | ,, | |
| १६ | --,,-- | ४२.१ | १९ | ,, | ,, | १४५ |
| १७ | --,,-- | ४२.१ | १९ | ,, | ,, | १४७ |
| १८ | --,,-- | | ६२.१ ३ डिसेंबर१९७४ | | | |
| १९ | --,,-- | ४२.१ | ४ डिसेंबर १९७४ | | | १२३७ |
| २० | --,,-- | ४३.१ | ३१ मार्च १९७४ | | | |
| २१ | --,,-- | ४३.१ | ३१ | ,, | ,, | २, ३, ४ |
| २२ | --,,-- | ४३.१-५डिसेंबर १९७४ | | | | ११११०२<br>१११९०३ |
| २३ | --,,-- | ५० | २३ मार्च १९७७ | | | |
| २४ | --,,-- | ५० | २३ ,, १९७७ | | | |

| | | |
|---|---|---|
| २५ | डिबेट महाराष्ट्र विधानसभास व्हॉल्यूम | ५०. २३ मार्च १९७७ |
| २६ | --,,-- | ५०. २३ ,, १९७७ |
| २७ | --,,-- | ५०. २३ ,, १९७७ |
| २८ | --,,-- | ५०. २३ ,, १९७७ |
| २९ | --,,-- | ५०. |
| ३० | --,,-- | ५०. २५ मार्च १९७७, पृक्र. १ |
| ३१ | --,,-- | ५०. ३० मार्च, १९७७, पृ.क्र. १, २. |
| ३२ | --,,-- | ५१. १-७ जुलै १९७७ |
| ३३ | --,,-- | ५१. १. १५ जुलै १९७७, पृ.क्र. १०।१ |
| ३४ | --,,-- | ५१. १-१५ ,, १९७७, पृ.क्र. १०।५ |
| ३५ | --,,-- | ५१. १-१५ ,, १९७७, पृ.क्र. १०।११ |
| ३६ | --,,-- | ५१. १-१५ ,, १९७७, पृ.क्र. १०।२३ |
| ३७ | --,,-- | ५१. १-१५ ,, १९७७ पृ.क्र. ४ |
| ३८ | --,,-- | ५१. १-१५ ,, १९७७, पृ.क्र. १७।१९ |
| ३९ | --,,-- | ५१. २-२२ जुलै १९७७ |
| ४० | --,,-- | ५१. २-२२ जुलै १९७७, पृ.क्र. १५।८ |
| ४१ | --,,-- | ५१. २-२२ जुलै १९७७, पृ.क्र. १५।३७ |
| ४२ | --,,-- | ५१. २-२५ ,, १९७७, पृ.क्र. १८।५३ |
| ४३ | --,,-- | ५१. २-२९ ,, १९७७, पृ.क्र. २०।५८ |
| ४४ | --,,-- | ५१. २-१ ऑगस्ट १९७७, पृ.क्र. २१।९७ |
| ४५ | --,,-- | ५२. ३० नोव्हे. १९७७, पृ.क्र. १३।२३ |
| ४६ | --,,-- | ५२. ३० ,, १९७७, पृ.क्र. |
| ४७ | --,,-- | ५२. ३ ,, १९७७, पृ.क्र. १३।१० |
| ४८ | --,,-- | ५२. ३ ,, १९७७, पृ.क्र. १३।१७ |
| ४९ | --,,-- | ५२. ३ ,, १९७७, पृ.क्र. १३।४२ |
| ५० | --,,-- | ५२. २० ऑक्टोबर, ७७, पृ.क्र. ४।२३ |
| ५१ | --,,-- | ५२. २० ऑक्टो., १९७७, पृ.क्र. ४।२७ |
| ५२ | --,,-- | ५२. २० ,, १९७७, पृ.क्र. ४।३० |

५३ डिबेट महाराष्ट्र विधानसभा व्हॉल्यूम ५२, २७ ऑक्टोबर, १९७७, पृ.क्र. ८१२४

५४ --,,-- ५२.,, ,, १९७७, पृ.क्र. ८१२७

५५ --,,-- ५२, २७ ऑक्टोबर १९७७, पृ.क्र. ८१२७

५६ --,,-- ५२, २७ ,, १९७७, पृ.क्र. ८१२६

५७ --,,-- ५२, २७ ऑक्टोबर १९७७, पृ.क्र. ८१४२

५८ दै. पुढारी - २८ फेब्रुवारी १९७८

५९ दै. पुढारी - ३ जून १९८०.

६० दै. पुढारी - २ मार्च १९९०.